दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३७५ मंगळवार दि.२२ सप्टेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-375 Tuesday, Dt.22 September 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# अमली पदार्थांच्या विळख्यातून बीडला मुक्त करणार..!

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा कठोर पवित्रा..

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी आणि क्षेत्रीय स्तरावरील ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ प्रतिबंधात्मक समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अमली पदार्थांच्या विरोधात १०० टक्के कडक कारवाया करण्याचे आदेश दिले असून, व्यसनमुक्तीसाठी संबंधित यंत्रणेने आता पूर्णपणे 'क्शन मोड'वर येणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.

बैठकीच्या सुरुवातीला बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी 'कोटपा' (उजढझ-) कायद्यांतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कारवाया करून अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची

शासन निर्णयाचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, १० जुलै २०२३ च्या आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अमली पदार्थ तसेच तंबाखू विरोधी कारवाया करण्याचे अधिकार व सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता केवळ प्रशासनावर भिस्त न ठेवता, मुख्याध्यापकांनी देखील या समाजसुधारणेच्या कामात हिरिरीने पुढे यावे. विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवणाऱ्या प्रत्येक समाजकंटका विरुद्ध एकजूट होऊन सक्त कायदेशीर कारवाया करण्याचे निर्देश त्यांनी दिले.



### मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांवर अमली पदार्थ विरोधी कारवायांची जबाबदारी ?

अमली पदार्थांचे सेवन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असून, याला वेळीच वेसण घालण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाने समन्वय साधून संयुक्त मोहीम राबवावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या बैठकीत केले.

## कोल्हापुरात रंगणार 'मराठी चित्रपटगीत महोत्सव'

### २७ व २८ सप्टेंबर रोजी मराठी चित्रपटगीतांची सुरेल मैफल, रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य




कोल्हापूर ।प्रतिनिधी

मराठी चित्रपटसृष्टीच्या समृद्ध संगीत परंपरेचा आणि अविस्मरणीय चित्रपटगीतांचा रसिकांना अनुभव देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने 'मराठी चित्रपटगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. रविवार, दि. २७ सप्टेंबर आणि सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवन, ताराराणी विद्यापीठ, कमला कॉलेज परिसर, राजारामपुरी,

पान २ वर...

## ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतले पुण्यातील मानाच्या पांच गणपतीसह विविध गणेशांचे दर्शन





### ठिक ठिकाणी केली आरती ; गणेश मंडळाच्या वतीने झाले जंगी स्वागत

पुणे ।प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज शहरातील मानाच्या पांच गणपतीसह विविध गणेशांचे दर्शन घेतले. ठिक ठिकाणी त्यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. गणेश

पान २ वर...

# मराठवाड्यात पाणीटंचाई उद्भवू नये यासाठी सूक्ष्म नियोजन करा - राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

## पाणीटंचाई व पाणीपुरवठा योजनांचा विभागीय आढावा संपन्न

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

मराठवाड्यात यंदा सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमान कमी झाले असून संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोर व गावनिहाय नियोजन करावे. नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा नियमित व सुरळीत पुरवठा होईल यासाठी आवश्यक उपाययोजनांचे आतापासूनच सूक्ष्म नियोजन करावे. तसेच प्रलंबित पाणीपुरवठा योजनांची कामे गतीने पूर्ण करावीत, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज दिले.






जिल्हाधिकारी कार्यालयात राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी मराठवाड्यातील पाणीटंचाईची सद्यस्थिती, पर्जन्यमान, उपलब्ध पाणीसाठा, संभाव्य टंचाई तसेच विविध पाणीपुरवठा योजनांचा विभागीय आढावा घेतला.

यावेळी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, अपर आयुक्त ( महसूल ) रिता मैत्रेवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सहसचिव गीता कुलकर्णी यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे पाणीटंचाई कृती आराखडा

पान २ वर...

# परळीच्या पाणी पुरवठ्यासाठी प्रत्यक्ष आढावा; नागापूर जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी

### नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री गित्ते,मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नगर परिषद पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी जलशुद्धीकरण प्रकल्पाची केली पाहणी



परळी वैजनाथ (प्रतीनिधी) :-

शहरातील पाणी पुरवठ्याच्या सद्यस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र गित्ते, नगर परिषद पदाधिकारी, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे व अधिकाऱ्यांनी नागापूर येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी उपलब्ध जलसाठा, जलशुद्धीकरण प्रक्रिया आणि पाणीपुरवठा यंत्रणेची सविस्तर पाहणी करण्यात आली.

यावेळी प्रकल्पातील ब्लिचिंग व तुरटीचा उपलब्ध साठा, जलशुद्धीकरणाची सद्यस्थिती तसेच जुना प्लॅन्ट आता अकार्यक्षम झाल्याने त्याचीही पाहणी करण्यात आली. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील एअर वॉल्व्हची स्थिती देखील तपासण्यात आली.तसेच प्रकल्प परिसरातील कर्मचारी निवासस्थानांचीही पाहणी करण्यात आली. निवासस्थानांची झालेली

पान २ वर...



## संपादकीय....

# सरकारी संवेदनशीलतेचाच दुष्काळ!

सरकारने पंचनाम्याची तारीख ठरवण्यापेक्षा मदत वाटपाची सुरुवात करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्याचे नुकसान दिवसेंदिवस वाढत असताना सरकारने ५ ऑक्टोबरची वाट पाहणे म्हणजे दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांची गंमत पाहण्याचा प्रकार आहे.

सणवारांचा काळ असल्याने राज्याच्या शहरी भागात सध्या मोठ्या उत्सवाचे वातावरण आहे. मुंबई, पुणे यांसारख्या महानगरांमध्ये गणेशोत्सवाचे मोठमोठे सोहळे होत आहेत. मंत्री, नेत्यांच्या घरच्या गणरायांचे सोहळे ही अगदी भव्यदिव्य प्रकारात मोडणारे आहेत, तर दुसरीकडे मराठवाडा, विदर्भासह उत्तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पावसासाठी आभाळाकडे डोळे लावून बसलेली अभागी जनता वृत्तवाहिन्यांवरील सोहळे पाहून दिवस ढकलत आहे. आभाळ कोरडे आहे, शेतकरी हवालदिल आहे, पिके करपली आहेत. सरकार उत्सवात मग्न आहे. मोदींच्या वाढदिवसासाठी भाजप तेलाचे दिवे लावण्याचे आवाहन करत आहे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाजप नेत्यांपेक्षा मोठमोठ्या जाहिराती वृत्तपत्रात देत आहेत. गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येऊन हिंदी भाषेचे महत्त्व सांगून नवा वाद पेटविण्याचा प्रयत्न करतात. या सर्वांना महाराष्ट्र दुष्काळात होरपळतोय याची कल्पना तरी आहे का? असा प्रश्न सामान्य माणसाला पडलाय. कारण यापैकी कोणीही शेतकऱ्यांवर आलेल्या या भीषण संकटाबद्दल तोंडातून चकार शब्द काढत नाही.

पान १ वरून..

**कोल्हापुरात रंगणार ....**

कोल्हापूर येथे हा महोत्सव होणार आहे.

दोन दिवसांच्या या महोत्सवातून मराठी चित्रपटसृष्टीतील विविध कालखंडातील लोकप्रिय आणि सदाबहार गीतांचा सुरेल आविष्कार रसिकांना अनुभवता येणार आहे. मराठी चित्रपटगीतांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाशी जोडलेली भावविश्वे, संगीतपरंपरा आणि गीत-संगीताचा समृद्ध वारसा रसिकांसमोर सादर करण्यात येणार आहे.

हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन व प्रसार करण्यासोबतच विविध कलाप्रकार आणि संगीतपरंपरा रसिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या महोत्सवातील दोन्ही दिवसांचे कार्यक्रम प्रवेश विनामूल्य असून कोल्हापूर व परिसरातील रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून 'मराठी चित्रपटगीत महोत्सवा'चा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

**ना. पंकजाताई मुंडे ...**

मंडळाच्या वतीने यावेळी त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं.

पुण्यातील गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरात लोकप्रिय आहे. गणेशाच्या भव्य दिव्य मुर्तींचे तसेच देखाव्यांचे याठिकाणी आकर्षण असते. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे ना. पंकजाताई मुंडे यांनी आजच्या पुणे दौ-यात सायंकाळी मानाच्या पांच गणपतीपैकी पहिल्या कसबा पेठेतील गणपतीचे दर्शन घेऊन आरती केली. त्यानंतर तांबडी जोगेश्वरी, केसरीवाडा, गुरूजी तालीम मंडळ, तुळशीबाग, भाऊसाहेब रंगारी, दगडूसेठ हलवाई, केसरीवाडा, साने गुरूजी तरूण मंडळ आदी गणेश मंडळांना भेटी देवून श्रींची आरती केली. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, सदाशिव खाडे, धिरज घाटे, अशोक मुंडे व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरात आगमन होताच ना. पंकजाताई मुंडे यांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठिक ठिकाणी जोरदार स्वागत केले.

**मराठवाड्यात पाणीटंचाई ...**

तसेच आगामी काळात करावयाच्या अपेक्षित कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती दिली.

मराठवाड्यात सरासरीच्या ६३.४० टक्के पर्जन्यमान

जून ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत मराठवाड्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ६७९.५० मि.मी. असून आतापर्यंत ४३०.८० मि.मी. पाऊस झाला आहे. हे प्रमाण सरासरी वार्षिक पर्जन्यमानाच्या

पान १ वरून..

६३.४० टक्के आहे. या कालावधीत अपेक्षित पर्जन्यमान ६२९.७० मि.मी. असून त्याच्या तुलनेत प्रत्यक्ष पर्जन्यमान ६८.४१ टक्के आहे.

जिल्हानिहाय छत्रपती संभाजीनगरमध्ये ४२२.३० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ७२.६० टक्के, जालना ४३८.५० मि.मी. म्हणजे ७२.७१ टक्के, बीड ३३१.३० मि.मी. म्हणजे ५८.५२ टक्के, लातूर ३५१.७० मि.मी. म्हणजे ४९.८२ टक्के, धाराशिव ३३७.९० मि.मी. म्हणजे ५६.०३ टक्के, नांदेड ५८७.८० मि.मी. म्हणजे ७२.१८ टक्के, परभणी ४२०.७० मि.मी. म्हणजे ५५.२६ टक्के आणि हिंगोली जिल्ह्यात ५४३.४० मि.मी. म्हणजे सरासरीच्या ६८.३३ टक्के पर्जन्यमान झाले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात सध्या चारा टंचाई नाही

छत्रपती संभाजीनगर विभागात ६ लाख ५० हजार २८२ लहान, २६ लाख ४५ हजार ७२६ मोठी आणि २० लाख ६३ हजार ४५५ शेळी-मेंढी अशी एकूण ५३ लाख ५९ हजार ४६२ पशुधन संख्या आहे. या पशुधनासाठी दररोज सुमारे २० हजार १२५ मेट्रिक टन चाऱ्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत विभागात ४४ लाख ८१ हजार १३६.८५१ मेट्रिक टन चारा उपलब्ध असून सध्या चारा छावणीची आवश्यकता नाही.

सध्या उपलब्ध चारा जिल्हानिहाय साधारणतः ८९ ते २१० दिवस पुरेल एवढा आहे. जालना जिल्ह्यात सर्वात कमी ८९ दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध आहे. विभागात डिसेंबर २०२६ पासून चारा टंचाई जाणवण्याची शक्यता लक्षात घेऊन आतापासून नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. रब्बी पिकांची लागवड कमी झाल्यास जिल्ह्यातील चारा टंचाई पुढे ढकलली जाऊ शकते. उपलब्ध चाऱ्यामध्ये खरीप व रब्बी हंगामातील चारा, बांधावरील, पडीक जमीन क्षेत्रावरील तसेच वनक्षेत्रातील चाऱ्याचा समावेश आहे.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन गावनिहाय कृती आराखडा तयार ठेवावा, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, उपलब्ध जलस्रोतांचे योग्य व्यवस्थापन करावे आणि आवश्यकतेनुसार पर्यायी जलस्रोत सज्ज ठेवावेत, अशा सूचना दिल्या.

पाणीपुरवठा योजनांची प्रलंबित कामे गतीने पूर्ण करावीत. पाणीपुरवठ्याबाबत नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे. पाणीटंचाईसोबतच पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याच्या उपलब्धतेवरही सातत्याने लक्ष ठेवावे. संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयातून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी पूर्वतयारी करावी, असे निर्देशही राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

**परळीच्या पाणी ...**

दुरवस्था पाहता आवश्यक दुरुस्ती व देखभालीबाबत यावेळी आढावा घेण्यात आला. सध्या प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा असून त्यापैकी अंदाजे १५ टक्केच पाणी उपयुक्त साठा आहे. विशेष म्हणजे अद्यापही वाण नदीला समाधानकारक पाणी आलेले नाही.या अत्यंत गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करून प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करण्याची गरज आहे.

दरम्यान, उपलब्ध पाणीसाठा अत्यंत मर्यादित असताना अनधिकृत पाणीउपशावर प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केली. परळी शहराच्या हक्काच्या पाण्याचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस व कठोर पावले उचलावीत, अशी स्पष्ट भूमिका यावेळी मांडण्यात आली.पाण्याचे काटेकोर नियोजन आवश्यक आहे. नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा मिळावा यासाठी आवश्यक उपाययोजना सुरू आहेत. नागरिकांनीही पाण्याचा काटकसरीने वापर करून प्रत्येक थेंब जपण्यासाठी नगर परिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्री रविंद्र (पापा) गित्ते, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, गटनेते वैजनाथ सोळंके, मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, राजाभैय्या पांडे, माजी उपनगराध्यक्ष रविंद्र परदेशी व माजी नगरसेवक रमेश चौडे, शिवसेना युवक नेते रवींद्र गित्ते, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे, पाणी पुरवठा विभाग मधील संदीप समुद्रे, नागनाथ सोळंके आदी उपस्थित होते.

आवश्यक पाणी कपातीचा निर्णय घेणे गरजेचे

सध्या प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा असून त्यापैकी अंदाजे १५ टक्केच पाणी उपयुक्त साठा आहे. विशेष म्हणजे अद्यापही वाण नदीला समाधानकारक पाणी आलेले नाही.या अत्यंत गंभीर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी लवकरच आवश्यक पाणी कपातीचा निर्णय घेणे गरजेचे असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

# शेकडो सूचनांचा पाऊस ! विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रस्तावावर सखोल आढावा घेणार

## परीक्षा व भरती प्रक्रियेत सुधारणांसाठी टास्क फोर्सचा २४७ विद्यार्थ्यांशी थेट संवाद !






छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय भरती परीक्षा टास्क फोर्सने छत्रपती संभाजीनगर विभागातील २४७ विद्यार्थ्यांशी स्मार्ट सिटी कार्यालयात थेट संवाद साधला. यावेळी परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका तपासणी, पदसंख्या, परीक्षा केंद्रे, निकाल, नियुक्ती, प्रतीक्षा यादी व तक्रार निवारण यासह विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी सूचना मांडल्या.

टास्क फोर्सच्या अध्यक्ष तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव (सेवा) व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस समितीचे सदस्य तथा पोलीस महासंचालक सदानंद दाते, सदस्य सचिव तथा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, सदस्य तथा नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे समितीचे सदस्य तथा संघ लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य एअर मार्शल अजित शंकरराव भोसले आणि सदस्य तथा आयआयटी मुंबईचे प्राध्यापक श्यामप्रसाद करगड्डे सहभागी झाले. या संवाद कार्यक्रमात सातही जिल्ह्यांतील जिल्हाधिकारी कार्यालयांतून विद्यार्थी ऑनलाइन सहभागी झाले होते.

आज सकाळपासून विद्यार्थ्यांनी विविध गटात भेटी देत अनेक सूचना केल्या. टास्क फोर्स सदस्यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सूचनाला गांभीर्याने ऐकून घेतले. विद्यार्थ्यांनी परीक्षांचे वार्षिक वेळापत्रक निश्चित करून त्याचे पालन करावे, परीक्षा पद्धती व अभ्यासक्रमात वारंवार बदल करू नयेत आणि बदल आवश्यक असल्यास पुरेशी पूर्वसूचना द्यावी, अशी मागणी केली. विविध संवर्गांतील रिक्त पदांची संख्या वेळेत जाहीर करून उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, जलसंपदा, वैद्यकीय व दंत वैद्यकीय अधिकारी यांसह अन्य पदांची नियमित भरती करावी, अशी सूचनाही करण्यात आली. एकाच उमेदवाराची अनेक पदांवर निवड झाल्यास पदनिवड व पदाचा त्याग (ऑप्टिंग आऊट) याबाबत स्पष्ट धोरण असावे. तसेच रिक्त पदांवर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

प्रश्नपत्रिका निर्मितीपासून छपाई, वाहतूक व वितरणापर्यंतची प्रक्रिया अधिक सुरक्षित करावी, प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या व्यक्तीलाही परीक्षेचे स्वरूप व प्रश्नपत्रिकेची माहिती मिळणार नाही, अशी व्यवस्था विकसित करावी आणि प्रश्नपत्रिका फुटीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा, अशी सूचना विद्यार्थ्यांनी केली. प्रश्नपत्रिकांतील चुका व भाषांतरातील त्रुटी टाळण्यासाठी विषयतज्ज्ञांची मदत घ्यावी. राज्यसेवा मुख्य परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरूपाची ठेवावी, प्रश्नांची काठिण्याची पातळी विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी सुसंगत असावी आणि गट-ब व गट-क परीक्षांतील भाषा विषय पात्रता स्वरूपाचे ठेवावेत, अशा सूचनाही मांडण्यात आल्या.

उत्तरपत्रिका तपासणी व गुणांकनासाठी समान निकष निश्चित करून परीक्षकांची गुणवत्ता व पात्रता तपासावी, अशी मागणी करण्यात आली. उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची कार्बन प्रत, प्राथमिक व अंतिम उत्तरतालिका तसेच आदर्श उत्तरे उपलब्ध करून द्यावीत आणि आवश्यकतेनुसार फेरतपासणीची सुविधा द्यावी, अशी सूचना करण्यात आली. कृषी सेवा मुख्य परीक्षा २०२३ व राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ मधील उत्तरपत्रिका तपासणी, गुणदान व गुणांतील फरकाबाबत विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदविले. चुकीचे प्रश्न व परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी पुराव्यासह लेखी स्वरूपात सादर करण्याचे आवाहन व्ही. राधा यांनी केले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ९ ते १८ सप्टेंबर दरम्यान भरती परीक्षा सुधारणांसंदर्भात ३ हजार ६९४ निवेदने व ९ हजार ६९४ ई-मेल प्राप्त झाले आहेत. त्यापैकी सुमारे ३ हजार ४३२ ई-मेलला प्रशासनाकडून उत्तरे देण्यात आली आहेत. प्राप्त सूचना व निवेदनांचे ६० विषयांमध्ये वर्गीकरण करण्यात आले असून, त्याआधारे सादरीकरण तयार करण्यात आले आहे. स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, नुकतेच उत्तीर्ण झालेले उमेदवार व नवनियुक्त कर्मचाऱ्यांकडूनही सूचना घेण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., सह आयुक्त मंजुषा मिसकर आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती. एम. पी. मर्ढेकर, ४ थे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १४३१/२०२६**
**सरस्वती झुळुक व इतर वि. निरंक**
**ॲड. पी.एन. जरांगे यांच्या मार्फत**

ज्यापेक्षा भिमराव देवराव झुळुक हे दिनांक १५.१०.२०२३ रोजी एम्स हॉस्पिटल, डोंबिवली येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ सरस्वती भ्र. भिमराव झुळुक, वय ६५ वर्षे, धंदा-घरकाम,

२.विशाल पि. भिमराव झुळुक, वय ३९ वर्षे, धंदा-खाजगी नोकरी, वरील दोघे रा. लिंबारूई, ता. जि. बीड.

ह. मु. ३०२, जिगर पॅलेस को-ऑप. हौसिंग सोसायटी, चिकनघर रोड, सेंट जोसेफ कॉलनी जवळ, चिकनघर, कल्याण (पश्चिम), ठाणे, ता.जि. ठाणे.

३.वैशाली भ्र. उमेश पाटील, वय - ४७ वर्षे, धंदा - घरकाम,

रा. ११/२०५, अमोघसिध्दी सोसायटी, इनकम टॅक्स कॉलनी जवळ, मेघवाडी, जोगेश्वरी (पुर्व), मुंबई.

अर्जदारांची मागणी-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत..

असे की, अर्जदार कं. १ ही मयत यांची पत्नी आहे. अर्जदार कं. २ हा मयताचा मुलगा आहे व अर्जदार कं. ३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयत भिमराव यांचे आई वडील पुर्वीच मयत झालेले अर्जदार व्यतिरिक्त इतर मयतास कोणीही कायदेशिर वारस नाही असे वरील अर्जदार यांचे म्हणणे आहे. अर्जदार यांनी मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात त्यांनी हा अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत भिमराव देवराव झुळुक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २२/१०/२०२६ आहे.

आज दिनांक १६ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर,बीड**

शिक्का

**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-११६७ दि.१०.०८.२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुर्यकांत भास्करराव मुळे, रा.हरतखेडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुर्यकांत भास्करराव मुळे | स्वतः | १२.०५.१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि- दि. . .२०२६**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुकेश रामेश्वर राठोड, रा.पिठोरी सिरसगांव तांडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अक्षरा मुकेश राठोड | मुलगी | ११.०२.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-२५७ दि.-.-.-**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **मुकेश रामेश्वर राठोड, रा.पिठोरी सिरसगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुकेश रामेश्वर राठोड | स्वतः | २३.०४.१९९६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**जाहीर प्रकटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार**
**भोकरदन यांचे न्यायालयात**
**जा.क्र.२०२३/एम.ए.जी/कावी-४६०**
**अप्पा भिका शहाणे**
**विरुद्ध**
**ग्रामसेवक ग्रा.पं.कोपार्डा ता.भोकरदन जि.जालना**
**प्रकरण:- जन्म मृत्यू नोंदणी नियम २९६९ सुधारीत**

कलम १३(३) अन्वये अर्ज ज्या अर्थी अर्जदार श्री अप्पा भिका शहाणे रा. कोपार्डा ता.भोखरदन जि.जालना येथील रहिवाशी असून अर्जदार यांनी त्यांचा मुलगा नामे रामेश्वर अप्पा शहाणे यांचा जन्म दिनांक ०३/०९/२००४ रोजी मौ.कोपार्डा ता.भोकरदन येथे झाला असल्याचे अर्जात नमूद केले असून त्या अनुषंगाने त्यांनी जन्म प्रमाणपत्र आदेश मिळणे साठी त्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की सदर जन्म नोंद बाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात आक्षेप सादर करावा जर नमूद केलेल्या कालावधी मध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबंधित प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०१/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी भोकरदन**

# आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून कॅन्सरग्रस्त रुग्णाला दिलासा; मुख्यमंत्री निधीतून ८० हजारांची मदत मंजूर

पाटोदा (विशेष प्रतिनिधी):

आ. सुरेश धस यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मोठा आरोग्यविषयक आधार मिळत आहे. तालुक्यातील वैद्यकीनी येथील सुदामती मकाळ या कॅन्सरग्रस्त महिला रुग्णाला आमदार सुरेश धस यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी'तून ८० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

**महाआरोग्य शिबिरात झाले होते आजाराचे निदान**

मिळालेल्या माहितीनुसार, वैद्यकीनी (ता. पाटोदा) येथील सुदामती मकाळ यांची प्रकृती अस्वस्थ असल्याने त्यांचे नातेवाईक अतुल मकाळ यांनी त्यांना आ. सुरेश धस यांच्या वतीने आयोजित 'मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरा'त तपासणीसाठी आणले होते. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणीदरम्यान त्यांना कॅन्सर गंभीर आजार असल्याचे निदान झाले.

निदानानंतर त्यांना पुढील तात्काळ व योग्य उपचारासाठी बार्शी येथील विराज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचाराचा खर्च मोठा असल्याने मकाळ कुटुंब चिंतेत होते.

**आमदारांच्या सूचनेनंतर स्वीय सहाय्यकांकडून तात्काळ पाठपुरावा**

मकाळ कुटुंबाची आर्थिक परिस्थिती व उपचाराची गरज लक्षात घेऊन आ. सुरेश धस यांनी तात्काळ आपले स्वीय सहाय्यक ड. महेश बेदरे यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक तो प्रशासकीय पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले. यावेळी

**मकाळ कुटुंबाकडून आ.धस यांची कृतज्ञता व्यक्त केली**

एन वेळेवर ८० हजार रुपयांची मदत उपलब्ध झाल्याने मकाळ कुटुंबाला उपचाराच्या मोठ्या खर्चात मोठा दिलासा मिळाला आहे. या मोलाच्या मदतीबद्दल सुदामतीताईंचे चिरंजीव बाळासाहेब मकाळ यांनी आमदार सुरेश धस व त्यांच्या टीमचे मनापासून आभार मानले आहेत.



गरजू रुग्णाला योग्य वेळी उपचारासाठी आवश्यक आर्थिक आधार मिळवून देणे आणि त्यांचे प्राण वाचवणे, हीच खरी जनसेवा आणि माझ्या कामाची पावती आहे.

– आ. सुरेश धस

# गणेशोत्सवात मिरवणुका, कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणी

## विशिष्ट प्रकारचे मुखवटे वापरण्यास निर्बंध

सांगली ।प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच, हा सण शांतता आणि सौहार्दपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी उपाययोजनेचा भाग म्हणून सांगली जिल्ह्यात गणेशोत्सवातील मिरवणुका, कार्यक्रम व सार्वजनिक ठिकाणी विशिष्ट प्रकारचे मुखवटे वापरण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ अन्वये याबाबत आदेश जारी केला आहे.

गणेशोत्सव काळात देखावे पाहण्यासाठी महिला, मुले, वृद्ध व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. काही व्यक्ती राक्षस, भूत, देव, दानव तसेच विविध प्राण्यांचे मुखवटे घालून देखावे पाहण्यासाठी अथवा मिरवणुकीत सहभागी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा मुखवट्यांमुळे लहान मुले, वृद्ध व नागरिकांमध्ये भीती निर्माण होण्याची शक्यता असून काही समाजकंटक किंवा रेकॉर्डवरील गुन्हेगार ओळख लपविण्यासाठी त्याचा गैरवापर करू शकतात, अशी शक्यता आदेशात नमूद करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर संपूर्ण सांगली जिल्ह्यात २१ सप्टेंबर २०२६ रोजी २१.०० वाजल्यापासून ते २६ सप्टेंबर २०२६ रोजीचे २३.५९ या वेळेत गणेशोत्सव-२०२६ च्या अनुषंगाने मिरवणुका, कार्यक्रम, सार्वजनिक ठिकाणे, मार्ग व रस्त्यांवर, कोणत्याही व्यक्ती, सार्वजनिक मंडळातील सदस्य यांना देखावे पाहण्यासाठी व मिरवणुकीमध्ये सामील होत असताना विशिष्ट प्रकारचे (राक्षस, भूत, देव, दानवांचे, प्राण्यांचे) मुखवटे वापरण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

# ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा

## जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांचे ऑडिट करावे, चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा

मुंबई ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य वापराचे तातडीने लेखापरीक्षण करून पुढील ऑगस्टपर्यंतचा पाणीपुरवठा आराखडा तयार करावा. नागरिकांसह पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दिले.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दूरदृष्यप्रणालीद्वारे जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जालना जिल्ह्यातील धरणे, तलाव, विहिरी, लघुपाटबंधारे आणि अन्य नैसर्गिक जलस्रोतांतील पाणीसाठ्याचे लेखापरीक्षण पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

जायकवाडी प्रकल्पातून होणाऱ्या पाणीपुरवठ्याची स्थिती आणि अंबड व जालना शहरांना उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा कालावधी यांचा अचूक अंदाज घ्यावा. पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध न झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पर्यायी नियोजन करावे, असे पालकमंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

**पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करा**

महानगरपालिका, नगरपंचायती, मोठ्या ग्रामपंचायती तसेच दुर्गम व डोंगराळ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत आतापासून निश्चित करावेत. या स्रोतांतील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करून आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोत तयार ठेवावेत. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी शेती, उद्योग, मोठी बांधकामे आणि अन्य पाणीखाऊ वापरांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करावा.

टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक आणि परिणामकारक ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी प्रत्यक्ष गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याची खात्री करावी, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले.

**चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा**

जालना जिल्ह्यातील पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य तूट यांचा समावेश असलेला स्वतंत्र चारा कृती आराखडा तयार करावा. चारा डेपो अथवा चारा छावण्यांची आवश्यकता, जिल्ह्याची चारा स्वयंपूर्णता आणि अतिरिक्त चारा मिळविण्याचे स्रोत निश्चित करावेत. शेजारील जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून तेथील चारा उपलब्धतेचा अभ्यास करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

पाणी उपलब्ध असलेल्या भागांतील शेतकऱ्यांना चारा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहित करावे. गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याची व्यवहार्यता तपासून त्याबाबतचा निर्णय प्रस्ताव तयार करावा. चारा छावण्या अथवा अन्य उपायांसाठी राज्यस्तरीय निर्णय आणि निधीची आवश्यकता असल्यास शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले.

पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चारा या विषयांवर केंद्रित स्वतंत्र बैठक २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे. या बैठकीसाठी जलस्रोतांचे लेखापरीक्षण, चारा नियोजन, संभाव्य पाणीटंचाईची गावे आणि आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती तयार ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, सर्व जलस्रोतांचे लेखापरीक्षण करून संभाव्य पाणीटंचाईची ठिकाणे निश्चित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल. तसेच पिण्याचे पाणी व चारा उपलब्धतेवर विशेष लक्ष केंद्रित करून शेजारील जिल्ह्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वनियोजन करून उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील सर्व पाण्याचे स्त्रोत शोधून त्यांची उपलब्धता व सद्य:स्थितीची माहिती संकलित करून ठेवावी. तसेच, पिक कापणी प्रयोगाच्या आधारेच शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी पिक कापणी प्रयोग गांभीर्याने व अचूकपणे पूर्ण करावेत. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी टंचाईसंदर्भात बैठक घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांचे पूर्वनियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शब्दाला जलसंपदा मंत्री विखे पाटील यांचा तत्काळ प्रतिसाद

## कोयना धरणातून ३९८३, तर वारणा धरणातून ९०० क्युसेक विसर्ग सुरु

सांगली ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील पाणी टंचाईची संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत सांगली जिल्ह्यासाठी कोयना धरणांतून विसर्ग वाढविण्याबाबत शब्द टाकला. पालकमंत्र्यांच्या या मागणीला जलसंपदा मंत्री यांच्याकडून तत्काळ प्रतिसाद मिळाला असून, कोयना धरणांतून विसर्ग वाढविण्यात आला आहे. कोयना धरणातून विसर्ग वाढवत आता ३९८३ क्युसेक विसर्ग सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, वारणा धरणातूनही ९०० क्युसेक जलविसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी काळातील पाणीटंचाईची तीव्रता कमी होण्यास मदत होणार आहे.

जिल्ह्यातील पाणी स्थितीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात रविवारी झालेल्या बैठकीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजनांबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी थेट दूरध्वनीवरून चर्चा केली. सांगली जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन, कोयना धरणातून विसर्ग वाढवण्याची गरज व्यक्त केली.पालकमंत्र्यांनी केलेल्या या मागणीनंतर आजपासूनच कोयना धरणांतून विसर्ग वाढविण्यात आल्याने जिल्ह्याला मोठा दिलासा मिळाला आहे. या पाण्यामुळे पिण्याच्या पाण्याचे स्रोत भरून घेण्यास मदत होणार आहे.जिल्ह्यातील वारणा धरणात आज सकाळी ८ वाजेपर्यंत ३४.४० टी.एम.सी. पाणीसाठा असून या धरणाची साठवण क्षमता ३४.४० टी.एम.सी इतकी असल्याचे जपसंपदा विभागाने कळविले आहे.

# मुखेड उपजिल्हा रुग्णालयात सीटी स्कॅन रिपोर्ट अन् दिव्यांग प्रमाणपत्रासाठी रुग्णांचे बेहाल

## मुखेड शहर काँग्रेस आंदोलनाच्या तयारीत

### जिल्हा-शल्यचिकित्सकांना निवेदनाद्वारे तात्काळ हस्तक्षेपाची मागणी

( मुखेड : प्रतिनिधी )

येथील उपजिल्हा रुग्णालयातील प्रशासकीय उदासीनता आणि ढिसाळ कारभारामुळे सामान्य रुग्ण आणि दिव्यांगांचे अतोनात हाल होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. रुग्णालयात सीटी स्कॅन मशीन असूनही रिपोर्टिंग बंद असल्याने आपत्कालीन रुग्णांचे प्राण धोक्यात येत आहेत,तर दुसरीकडे मूलभूत सोयींअभावी दिव्यांगांना णऊखऊ प्रमाणपत्रासाठी रुग्णालयाचे हेलपाटे मारावे लागत आहेत.या दोन्ही गंभीर समस्यांवर त्वरित तोडगा काढावा,या मागणीसाठी शहर काँग्रेसच्या वतीने जिल्हा शल्यचिकित्सक (नांदेड) व वैद्यकीय अधीक्षकांना संयुक्त निवेदन देण्यात आले आहे.



उपजिल्हा रुग्णालयात सीटी स्कॅनची सुविधा उपलब्ध असून तंत्रज्ञांमार्फत स्कॅन काढले जातात.परंतु, टेली-रेडिओलॉजीचे कंत्राट बंद पडल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून रुग्णांना रिपोर्टच मिळत नाहीत.अपघातग्रस्त किंवा मेंदूला गंभीर दुखापत झालेल्या रुग्णांचे रिपोर्ट वेळेत न मिळाल्यामुळे डॉक्टरांना तात्काळ उपचार करणे अशक्य होत आहे.परिणामी,गरीब रुग्णांना नाईलाजाने महागड्या खाजगी केंद्रांमध्ये जाऊन स्कॅन करावा लागत आहे अथवा उपचारासाठी थेट नांदेड गाठावे लागत आहे.

मुखेड रुग्णालयात स्वावलंबन पोर्टलवर अर्ज केल्यानंतर वैद्यकीय तपासणीचे कोणतेही स्पष्ट वेळापत्रक उपलब्ध नाही.डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतरही अहवाल पोर्टलवर वेळेवर अपलोड केले जात नसल्याने प्रमाणपत्र मिळण्यास मोठा उशीर होत आहे.शिवाय,रुग्णालयात दिव्यांग रुग्णांसाठी रॅम्प,व्हीलचेअर आणि स्वतंत्र मदत कक्षाचा अभाव असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या दिव्यांगांची मोठी अडवणूक होत आहे.

सीटी स्कॅन रिपोर्टिंगचे कंत्राट त्वरित नूतनीकरण करावे आणि प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हंगामी रेडिओलॉजिस्टची सोय करावी.दिव्यांग तपासणीसाठी ठराविक वार व वेळ निश्चित करून त्याचा माहिती फलक रुग्णालयात लावावा.तपासणी अहवाल तात्काळ ऑनलाइन अपलोड करून ई-प्रमाणपत्रे वेळेत वितरीत करावीत.दिव्यांगांच्या सोयीसाठी स्वतंत्र मदत कक्ष,रॅम्प आणि व्हीलचेअर उपलब्ध करून द्याव्यात. रुग्णालयात रुग्णांसाठी इंजक्शन, औषधींचा तुटवड्यामुळे होणारी रुग्णांची गैरसोय टाळावी यासाठी शहर काँग्रेसचे अध्यक्ष हणमंत नारनाळीकर,पत्रकार राजु बनसोडे यांनी उपजिल्हा रुग्णालय मुखेड येथील वैद्यकीय अधिक्षकांना भेटून निवेदन दिले.

मुखेड उपजिल्हा रुग्णालय हे हजारो गरीब आणि ग्रामीण रुग्णांसाठी महत्त्वाचे केंद्र आहे.अत्यावश्यक सेवा अशा प्रकारे अर्ध्यावर ठप्प राहणे चिंताजनक आहे या निवेदनाच्या प्रति आरोग्य संचालक,जिल्हाधिकारी, स्थानिक खासदार,माजी आमदार आणि तहसीलदारांना पाठवण्यात आल्या असून,प्रशासनाने यावर तात्काळ तोडगा न काढल्यास तीव्र आंदोलन करणार असल्याचे शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांनी निवेदनातून सांगीतले आहे.




# अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत गंगावाडी येथील चक्रधर चिकणे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे गंगावाडी येथील चक्रधर चिकणे यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना अमरसिंह पंडित म्हणाले की,कार्यकर्त्यांना सोबत घेऊन गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये विकासाचा यज्ञ यापुढे चालू राहील जुन्या नव्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ताकद गेवराई विधानसभा मतदारसंघात वाढवावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती जगन्नाथ काळे, उपसभापती श्रीहरी पवार, आसाराम मराठे, विष्णू हात्ते, अरुण चाळक आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

गंगावाडी येथील चक्रधर चिकणे यांच्यासह रामदास मोरे, गहिनीनाथ बोराडे, विलास बोराडे, लक्ष्मण चव्हाण, सुरेश तवले, कृष्णा चिकणे, तुकाराम चिकणे, कैलास तवले, बाबुराव जाधव, माऊली चिकने, पांडुरंग सपकाळ, गणेश सपकाळ, सखाराम चिकणे, महेश उबाळे, अनिल टकले, ज्ञानेश्वर खाडे, दादासाहेब चव्हाण, गणेश चिकणे, महादेव चिकणे, खलील शेख, अमर शेख, बाबू पठाण, राहुल पवार, श्रीकिसन निकम, नितीन दशरथ, नितीन तुपे, राम बोराडे, शिवाजी यादव, बंडू चिकणे, अशोक चिकणे, साईनाथ अवले आदी कार्यकर्त्यांनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

# 'लोकसंवाद-२०२६'ला साक्री तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'लोकसंवादाची वारीगणेशभक्तांच्या दारी' चित्ररथातून शासकीय योजनांचा गावागावांत जागर

धुळे ।प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क विभागाच्या 'गणेशोत्सवातून लोकसंवाद-२०२६' या विशेष जनजागृती अभियानाला साक्री तालुक्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा माहिती कार्यालय, धुळे यांच्यातर्फे तयार करण्यात आलेला नाविन्यपूर्ण 'लोकसंवाद' चित्ररथ तालुक्यातील विविध गावांमध्ये तसेच सार्वजनिक गणेश मंडळांच्या परिसरात फिरून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि सेवांची माहिती दृकश्राव्य माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचवत आहे.

गणेशोत्सव हा श्रद्धा, उत्साह आणि व्यापक लोकसहभागाचा उत्सव आहे. सार्वजनिक गणेश मंडळांच्या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक एकत्र येत असल्याने या लोकसहभागाचा प्रभावी उपयोग शासनाच्या विविध योजनांची माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी करण्यात येत आहे. 'लोकसंवादाची वारी गणेशभक्तांच्या दारी' या संकल्पनेतून चित्ररथ गावोगावी पोहोचत असून, गणेश दर्शनासाठी आलेल्या भाविकांना शासनाच्या योजनांची माहिती सहज, सोप्या आणि प्रभावी पद्धतीने दिली जात आहे.

चित्ररथावर प्रदर्शित करण्यात आलेले माहितीफलक, योजनांचे संदेश आणि दृकश्राव्य सादरीकरण नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. शेतकरी, महिला, विद्यार्थी, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य कुटुंबांसाठी उपयुक्त असलेल्या विविध योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होत असल्याने नागरिकांकडून या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**विविध योजनांची माहिती**

या अभियानाच्या माध्यमातून कृषी, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, सामाजिक न्याय, कौशल्य विकास, रोजगार आदी विभागांच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी कृषीविषयक योजना, पीक विमा, अनुदान योजना, महिलांसाठी बचत गट व सक्षमीकरणाच्या योजना, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, युवकांसाठी कौशल्य विकास व रोजगाराच्या संधी, तसेच आरोग्यविषयक विविध योजनांबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

शासनाच्या विविध योजनांची पात्रता काय आहे, संबंधित योजना कोणत्या विभागामार्फत राबविली जाते आणि अधिक माहितीसाठी कुठे संपर्क साधावा, याबाबतही नागरिकांना मार्गदर्शन केले जात आहे. त्यामुळे जनजागृतीसोबतच पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्याचा उद्देश या अभियानातून साध्य होत आहे.




**दहिवेलमध्येही उत्स्फूर्त प्रतिसाद**

अभियानांतर्गत साक्री तालुक्यातील दहिवेल येथील 'दहिवेलचा राजा गणेश मित्र मंडळ' परिसरातही 'लोकसंवाद' चित्ररथाद्वारे शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी सहनिबंधक अधिकारी सुरेश पवार, दहिवेल ग्रामपंचायत सदस्य कन्हैयालाल माळी, गावातील प्रतिष्ठित नागरिक प्रभाकर सोनवणे, रुपेश बच्छाव जिल्हा माहिती कार्यालयाचे बंडू चौरे आदी उपस्थित होते.

साक्री तालुक्यात मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे गणेशोत्सवाला लोकसंवाद, लोकसहभाग आणि लोककल्याणाची अर्थपूर्ण जोड मिळाली असून, 'लोकसंवाद' चित्ररथ शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचविणारे प्रभावी माध्यम ठरत आहे.

## लोकसंवाद मोहिमेअंतर्गत बीड शहरात

# स्पर्धा परीक्षा, पोलीस भरती व सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन

बीड ।प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरात 'लोकसंवाद' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून बीड शहरातील आदर्श गणेश मंडळ (आदर्श नगर), हिंदवी स्वराज्य सार्वजनिक उत्सव समिती (श्रीराम नगर रोड) आणि ज्ञानज्योत गणेश मंडळ (चराटा फाटा) येथे मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी उपस्थित नागरिक, तरुण वर्ग आणि विशेषतः विद्यार्थ्यांना बहुमूल्य मार्गदर्शन केले.





मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांनी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, वेळेचे नियोजन कसे असावे आणि यशासाठी सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाच्या टिप्स दिल्या. तसेच पोलीस दलात दाखल होऊन देशसेवेची इच्छा बाळगणाऱ्या तरुणांसाठी पोलीस भरतीच्या तयारीबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यादरम्यान शारीरिक क्षमता चाचणीसोबतच लेखी परीक्षेसाठीचा नियमित सराव किती महत्त्वाचा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले.

आजच्या डिजिटल युगात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांवर विशेष भर देत त्यांनी उपस्थितांना सावध केले. ऑनलाईन फ्रॉड, लॉटरीच्या नावाखाली येणारे बनावट मेसेज, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि स्वतःची गोपनीय माहिती अनोळखी व्यक्तींसोबत शेअर न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. सायबर फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे महत्त्व त्यांनी उपस्थितांना पटवून दिले. गणेशोत्सवाच्या पवित्र वातावरणात धार्मिक कार्यक्रमांसोबतच अशा प्रकारच्या प्रबोधनपर उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल नागरिक व युवकांनी पोलीस प्रशासन आणि जिल्हा माहिती कार्यालयाचे आभार मानले.

## राजस्थानी आदर्श बालक मंदिर व मदनलाल सारडा विद्यालयात गणेश फेस्टिवलला उत्साहात सुरुवात

बीड (प्रतिनिधी)

संस्कृती, कला आणि संस्कारांचा संगम साधत येथील राजस्थानी सेवा समाज संचलित राजस्थानी आदर्श बालक मंदिर, व मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालय, पेठ बीड येथे 'राजस्थानी गणेश फेस्टिवल २०२६' चे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात उद्घाटन करण्यात आले. प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी शाळेच्या हॉल मध्ये गणरायाच्या आकर्षक मूर्तीची स्थापना करून विविध उपक्रम/स्पर्धा घेण्यात येतात. या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सोहनी सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. बियाळे मॅडम उपस्थित होत्या.




प्रास्ताविक व फेस्टिवलची रूपरेषा विभाग प्रमुख श्री. तोष्णीवाल सर यांनी मांडली. ते म्हणाले, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख नव्या पिढीला व्हावी या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे यंदाही हा गणेश फेस्टिवल आयोजित केला आहे. या फेस्टिवलमध्ये इयत्तानुसार खालील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

बालवाडीसाठी

नृत्य स्पर्धा, फॅन्सी ड्रेस कॉम्पिटिशन, रंगभरण स्पर्धा

इयत्ता १ ली :मराठी गोष्ट कथन स्पर्धा

- इयत्ता २ री : नृत्य स्पर्धा
- इयत्ता ३ री : समूह गीत गायन स्पर्धा
- इयत्ता ४ थी : प्रश्नमंजुषा (क्विझ) स्पर्धा

प्रमुख पाहुणे सौ. बियाळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अभ्यासासोबतच अशा सांस्कृतिक स्पर्धांमुळे आत्मविश्वास वाढतो.अध्यक्षीय समारोपाचे मनोगत व्यक्त करताना मुख्याध्यापक सोहनी सर म्हणाले, गणेश उत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो एकतेचे आणि कलेचे प्रतीक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.सर्व विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घ्यावा असे प्रतिपादन सरांनी केले. कार्यक्रमाचे अतिशय सुंदर आणि ओघवते सूत्रसंचालन सौ. मोराळे मॅडम यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्री. मंत्री सर यांनी मानले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी, पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## मुरुड येथे 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या योजनांविषयी मार्गदर्शन

### आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेबाबत जनजागृती

लातूर ।प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'लोकसंवाद २०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मुरुड येथे महाराज गणेश मंडळाच्या कार्यक्रमात आरोग्य विभाग, खादी ग्रामोद्योग महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यात आली.



एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व नागरिकांना युनिव्हर्सल हेल्थ कव्हर पुरवले जात आहे. या योजनेअंतर्गत कुटुंबातील एक किंवा सर्व सदस्यांना प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत आरोग्य कव्हरेज दिले जात असून, मूत्राशय किंवा मूत्रपिंड (किडनी) प्रत्यारोपणासाठी ४.५ लाख रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाते. याशिवाय, ज्येष्ठ नागरिकांना वैयक्तिकरित्या ५ लाख रुपयांपर्यंतचा अतिरिक्त लाभ दिला जातो, तसेच रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या रुग्णांना पी. एम. राहत निधीतून १.५० लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत तातडीने वैद्यकीय उपचार पुरवले जातात, अशी माहिती आरोग्य विभागाचे धनंजय नवगिरे आणि गोविंद सुरवसे यांनी दिली.

जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मधाचे गाव आणि प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी लोकसंवाद उपक्रमाचा हेतू विशद केला.यावेळी मुरुडचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश ठोंबरे यांच्यासह अभिषेक सहालुगडे, विकास सूर्यवंशी, शुभम जेलेवाड, विशाल कणसे, ओमकार करपे, अजिंक्य माळी, सौरभ सापसोड, रवी देशमुख, आकाश सुरवसे, गजानन वडगणे , सौरभ गायकवाड, गणेश वडगणे , ऋषभ हरंगुळकर, ऋषी राऊत, अजिंक्य नाडे, बंटी साळुंखे, रणजीत सुरवसे, दादा लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

### प्रधानमंत्री पीक विमा योजना, खरीप हंगाम २०२६-२७ च्या

# पीक कापणी प्रयोगांच्या ऑनलाईन नोंदी वेळेत पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

बीड ।प्रतिनिधी

प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ च्या पीक कापणी प्रयोगांच्या सद्यस्थितीचा व तालुका निहाय कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पीक कापणी प्रयोगांची ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याबाबत यंत्रणेला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.

बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तसेच जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी (बीडीओ)



आणि तालुका कृषी अधिकारी प्रत्यक्ष व दृकश्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) माध्यमातून उपस्थित होते. या सर्व यंत्रणांच्या समन्वयाने पीक कापणी प्रयोगांचे काम उत्तम प्रकारे पुढे जात आहे.

बैठकी दरम्यान अंबाजोगाई, आष्टी, बीड, गेवराई, धारूर, पाटोदा, शिरूर, वडवणी यासह विविध तालुक्यांमधील सोयाबीन, मूग, कापूस, बाजरी, तूर आणि इतर पिकांच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील ऑनलाईन नोंदींच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्या तालुक्यांमध्ये काही प्रयोग प्रलंबित आहेत, ते काम लवकरात लवकर आणि विहित मुदतीत शंभर टक्के पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, चालू हंगामात शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ सुरळीतपणे व वेळेत मिळवून देण्यासाठी पीक कापणी प्रयोगांची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागाने परस्पर समन्वयाने काम करून राहिलेली सर्व प्रलंबित कामे पूर्णत्वास न्यावीत. तसेच ज्या गावांचे 'नो क्रॉप रिपोर्ट' (छउठ) किंवा इतर तांत्रिक बाबींमुळे प्रयोग प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून शेतकऱ्यांच्या दाव्यांवर योग्य कार्यवाही होण्यास मदत होईल.

महसूल, कृषी आणि पंचायत या तीनही विभागांनी सहकार्याची भूमिका ठेवून पीक कापणी प्रयोगांचे कामकाज अधिक गतिमान करावे, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीच्या शेवटी केले.

# जात प्रमाणपत्र पडताळणीतील त्रुटींच्या पूर्ततेसाठी विशेष शिबिराचे आयोजन

रायगड-अलिबाग ।प्रतिनिधी

'सेवा संकल्प अभियान' कालावधीत इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थी तसेच सन २०२६-२७ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रलंबित प्रकरणांतील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेऊन आपल्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रायगड जयंत चाचरकर यांनी केले आहे.महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, रायगडमार्फत विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. समितीस्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांमधील आवश्यक कागदपत्रे व अन्य त्रुटींची पूर्तता करून प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी विद्यार्थ्यांना या शिबिराच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे.शिबिराचे ठिकाण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, १४०२ अ, प्लॉट नं. ९, स. नं. ७६/२ ब, सेंट मेरीज कॉन्व्हेंट स्कूल मागे, चेंढरे, अलिबाग येथे आहे.संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रकरणातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह शिबिरास उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा. शिक्षणातील प्रवेश प्रक्रिया लक्षात घेता विद्यार्थ्यांनी प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# कोरडा दुष्काळ जाहीर करा; पीक विम्याचा अग्रीम द्या

### चारा छावण्यांच्या मागणीसाठी बर्दापूर फाट्यावर रस्ता रोको; २० शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल

अंबाजोगाई(प्रतिनिधी) : तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन कोरडा दुष्काळ जाहीर करावा, पीक विम्याची अग्रीम रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी आणि जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात, या मागण्यांसाठी बर्दापूर फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक रोखल्याप्रकरणी सुमारे २० शेतकऱ्यांविरुद्ध बर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी बर्दापूर पोलिस ठाण्याचे जमादार गणेश विक्रम तांदळे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिसांच्या माहितीनुसार, माजी जिल्हा परिषद सदस्य अविनाश अशोक मोरे यांनी १५ सप्टेंबर रोजी निवेदन देऊन १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ११ या वेळेत बर्दापूर फाटा येथे रस्ता रोको करण्याचा इशारा दिला होता.या पार्श्वभूमीवर पोलिसांनी प्रतिबंधात्मक नोटीस बजावली होती. मात्र, त्यानंतरही आंदोलन करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. अविनाश मोरे यांच्यासह धनंजय मदने, शिवाजी मोरे (बर्दापूर), दिगंबर चव्हाण (नांदगाव), अँड. अजय बुरांडे (कानापूर मोहा, ता. परळी) तसेच अन्य १५ ते २० शेतकरी राष्ट्रीय महामार्गावर बसल्याने काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला.शेतकऱ्यांच्या मागण्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याबरोबरच पीक विम्याचा अग्रीम मोबदला तातडीने देणे आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

# सी.सी.आय.ला कापूस विक्रीसाठी 'कपास किसान' पवर नोंदणी करावी-सभापती जगन्ना काळे

गेवराई (प्रतिनिधी):- कृषि उत्पन्न बाजार समिती गेवराईच्या कार्यक्षेत्रातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापूस हंगाम २०२६-२७ मध्ये कापसाची किमान आधारभूत किंमत (एम.एस.पी.) अंतर्गत विक्री करण्यासाठी भारतीय कापूस महामंडळामार्फत सुरू करण्यात आलेल्या 'कपास किसान' पवर नोंदणी करावी, असे आवाहन कृषि उत्पन्न बाजार समिती गेवराईचे सभापती जगन्नाथराव काळे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना सभापती जगन्नाथ काळे म्हणाले की, सी.सी.आय.च्या सूचनेनुसार कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी १ सप्टेंबर २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'कपास किसान' पवर आपल्या कापूस पिकाची नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केल्यामुळे शासनाच्या किमान आधारभूत किंमत (एम.एस.पी.) खरेदी योजनेअंतर्गत कापूस विक्रीचा लाभ घेता येणार आहे. 'कपास किसान' पवर नोंदणी करताना शेतकऱ्यांनी कापूस पिकाचा पेरा असलेला सातबारा उतारा, आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक तसेच पीक पाहणीची नोंद आदी आवश्यक माहिती सोबत ठेवावी. नोंदणी करताना शेतकऱ्यांना काही अडचण आल्यास त्यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, गेवराई येथे संपर्क साधावा, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले आहे.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी निर्धारित कालावधीत 'कपास किसान' पवर नोंदणी करून शासनाच्या एम.एस.पी. खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ८३२९३१०८८८, ९७६५५८५७१५, ९०११८२८००७, ९९७५८०५७५७ या व्हॉट्सप हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधाव असे आवाहन बाजार समितीचे



सभापती जगन्नाथराव काळे यांनी केले आहे.

## पुढील ४८ तासांत महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढणार; मराठवाड्यासह अनेक भागांना सतर्कतेचा इशारा

बीड, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोलीसह मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

मुंबई, २० सप्टेंबर : महाराष्ट्रात पुढील ४८ तासांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून काही भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विशेषतः मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांसाठी हवामान विभागाने इशारा दिला आहे.

बीड, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोलीसह मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. २० सप्टेंबर ते २२ सप्टेंबरदरम्यान मराठवाड्यात मेघगर्जना व विजांसह वादळी हवामानाचा इशारा नोंदविण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात २० ते २२ सप्टेंबरदरम्यान काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर



आणि उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर परिसरातही पावसाची शक्यता आहे. मात्र जिल्हानिहाय इशाऱ्याची तीव्रता वेगवेगळी असल्याने नागरिकांनी स्थानिक हवामान विभागाच्या अद्ययावत सूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# सोन्याचे आमिष दाखवून जबरी चोरी भोकरदन पोलिसांची २४ तासांत धडाकेबाज कारवाई

## स्वस्तात सोने देण्याचे आमिष पडले महागात दोघांना बेड्या १.८० लाखांची संपूर्ण रोकड जप्त

भोकरदन इसरारखान पठाण :- स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखवून सोनार व्यावसायिकाकडील तब्बल १ लाख ८० हजारांची रोकड धक्काबुक्की करून जबरीने हिसकावून पोबारा करणाऱ्या दोघांच्या भोकरदन पोलिसांनी २४ तासांत मुसक्या आवळल्या. पोलिसांनी आरोपींकडून चोरीची संपूर्ण रोकड जप्त केल्याने या प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजी दानापूर, ता. भोकरदन येथे हा प्रकार घडला. जळगाव येथील सोनार व्यावसायिक संजय कालीपद महीती वय ४६ यांना कमी किमतीत सोने देण्याचे आमिष दाखवण्यात आले. आरोपींनी त्यांचा विश्वास संपादन केला. मात्र संधी मिळताच धक्काबुक्की करून त्यांच्या ताब्यातील १,८०,००० रोख रक्कम जबरीने हिसकावून घेत पोबारा केला.

घटनेची माहिती मिळताच भोकरदन पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन




तपासाची जबाबदारी पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी तत्काळ विशेष पथक तयार करून आरोपींचा शोध सुरू केला.

पोलिसांचे पथक लागले मागावर

पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके, पोलीस अंमलदार गणेश पिंपळकर, लक्ष्मण रानगोते, अर्जुन टेकाळे, योगेश गवळी तसेच गृहरक्षक दलाचे कर्मचारी शेख साजेद शेख यांच्या पथकाने तपासाची सूत्रे हाती घेत आरोपींचा माग काढला. अथक प्रयत्नांनंतर पोलिसांनी दोन्ही संशयित आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे

मस्तानखाँ मस्शीदखाँ पठाण, रा. कठोरा बाजार, ता. भोकरदन शेख कदीर शेख हमीद, रा. दानापूर, ता. भोकरदन दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना दि. २२ सप्टेंबर २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. २४ तासांत संपूर्ण रोकड पोलिसांच्या हाती तपासादरम्यान पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास करत आरोपींकडून चोरीची संपूर्ण रक्कम हस्तगत केली. मस्तानखाँ पठाण याच्याकडून ६० हजार, तर शेख कदीर शेख हमीद याच्याकडून १ लाख २० हजार, अशी एकूण १ लाख ८० हजारांची रोकड जप्त करण्यात आली.

अवघ्या २४ तासांत आरोपींचा शोध घेऊन संपूर्ण रोकड हस्तगत केल्याने भोकरदन पोलिसांच्या तपासकौशल्याची चर्चा परिसरात होत आहे. आमिषाला बळी पडू नका! कमी किमतीत सोने मोठा आर्थिक फायदा किंवा अन्य कोणतेही आमिष दाखवून फसवणूक अथवा लुटीचे प्रकार होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी अशा संशयास्पद व्यवहारांपासून सावध राहावे आणि संशयास्पद व्यक्ती अथवा हालचाली आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी असे आवाहन भोकरदन पोलिसांनी केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर तसेच प्रभारी अधिकारी संतोष माने, सहायक पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सागर शिंदे करीत आहेत.



## केजचे भुमिपुत्र डॉ.वैभव कराड यांच्या फिजिओ केअर व रिहॅब सेंटरचा बालेवाडी पुणे येथे मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ

केज/प्रतिनिधी

केज शहरातील भुमिपुत्र डॉ.वैभव विनायकराव कराड यांच्या फिजिओ केअर व रिहॅब सेंटरचे उद्घाटन दि.२० सप्टेंबर रविवार रोजी बालेवाडी पुणे येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले.डॉ.वैभव विनायक कराड यांच्या फिजियो केअर व रिहॅब सेंटरचे उद्घाटन त्यांचे काका अड.श्री. उद्धवरावजी अण्णा कराड अध्यक्ष,साने गुरुजी निवासी विद्यालय केज,श्री. संजय राख सोनपेठ गॅस एजन्सी संचालक, श्री.संतोष राख एम आय टी पुणे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी बोलताना डॉ. वैभव कराड यांनी उदघाटन प्रसंगी सांगितले की,त्यांचे शिक्षण एम डी स्पोर्ट मेडीसीन मध्ये झालेले असून रुग्णांसाठी मॅन्युअल थेरपी, स्पोर्टस्,स्पाइन व पोश्चर करेक्शन, अर्थोपेडीक न्युरो रिहॅब,गर्भावस्था व गर्भावस्थेनंतरची काळजी,इलोक्ट्रो थेरपी व शॉक वेव्ह थेरपी रुग्णाच्या सेवे साठी माफक दरात उपलब्ध असल्याचे सांगितले.उद्घाटन प्रसंगी मोठ्या प्रमाणावर वैद्यकिय क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक व मित्र मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.डॉ.वैभव विनायकराव कराड हे केज तालुक्यातील तांबवा येथील रहिवासी आहेत.वडील श्री.विनायकराव कराड हे जिल्हा परिषद बीड येथे सेवारत आहेत. तसेच आई सौ.वैशाली ताई कराड या बचपन इंग्लिश स्कूलच्या संचालिका आहेत. कराड परिवारातील सदस्य बालेवाडी पुणे येथे रुग्णसेवा करण्या साठी तत्पर झाले आहेत त्याबद्दल तांबवा व केज परिसरातुन कराड परिवारावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# ४८ दिवस पावसाची ओढ शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू

## करपलेली सोयाबीन-कापूस पिके पाहून आ.बबनराव लोणीकर थेट बांधावर

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी शासनदरबारी पाठपुराव्याची ग्वाही

परतूर पिराजी गायकवाड

आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी यंदा पुन्हा अस्मानी संकटाचा घाव आला आहे. तब्बल ४८ दिवस पावसाने ओढ दिल्याने परतूर तालुक्यातील खरीप पिकांची अवस्था दयनीय झाली असून सोयाबीन, कपाशी, मूग यासह अनेक पिके पाण्याअभावी करपली आहेत. वाढता उत्पादन खर्च घटलेले उत्पन्न आणि हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत नुकसानग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी केली. पूर, पिंपरखेडा, करंजी, शेलगाव, शिरपूर, पांडे पोखरी, सृष्टी आदी गावांमधील शेतशिवारात जाऊन त्यांनी पिकांची परिस्थिती जाणून घेतली.उभी पिके करपली शेतकऱ्यांची व्यथा ऐकली

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे. काही शेतांमध्ये उभी पिके अक्षरश करपून गेल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शेतकऱ्यांनी आमदार लोणीकर यांच्यासमोर पिकांचे नुकसान वाढलेला उत्पादन खर्च जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न आणि आर्थिक अडचणींची व्यथा मांडली.पीक उभे करण्यासाठी पैसा खर्च केला मात्र पावसाने साथ न दिल्याने आता हातात काय उरणार? असा सवाल शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. त्यामुळे केवळ पाहणी न करता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळणे गरजेचे असल्याची मागणी



यावेळी करण्यात आली.पंचनामे वस्तुनिष्ठ करा; मदत तातडीने द्या

नुकसानग्रस्त शेतीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी प्रशासन आणि शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्याची ग्वाही आमदार लोणीकर यांनी दिली.चारा-पाण्याचा प्रश्नही आगामी काळात गंभीर होण्याची शक्यता असल्याने या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधून आवश्यक उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या बांधावरच ठेचा-भाकरी

शेलगाव येथे पाहणीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांसोबत बांधावरच ठेचा-भाकरीचा आस्वाद घेतला. संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.अस्मानी संकटात शेतकऱ्यांना एकटे पडू देणार नाही संकट कितीही मोठे असले तरी शेतकरी बांधवांना एकटे पडू दिले जाणार नाही. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जाईल अशी ग्वाही आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे सांगत शासनाने शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या विविध निर्णयांचा त्यांनी उल्लेख केला. सध्याच्या अस्मानी संकटातही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बांधावरची व्यथा शासनाच्या दारात पोहोचणार

४८ दिवसांच्या पावसाच्या खंडानंतर शेतकऱ्यांच्या हातात उरलेले पीक वाचविण्यासाठी आता पंचनामे मदत आणि तातडीच्या उपाययोजनांची प्रतीक्षा आहे. आमदारांनी बांधावर जाऊन पाहणी केली असली तरी शेतकऱ्यांच्या नजरा आता शासनाच्या मदतीकडे लागल्या आहेत. त्यामुळे पाहणीचे रूपांतर प्रत्यक्ष मदतीत कधी होते याकडे परतूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# १,४०० अर्जदारांच्या नोकरभरतीवर प्रश्नचिन्ह; भरती प्रक्रिया रद्द करण्याची मागणी

## स्वाभिमानी संघटनेचे संपर्कप्रमुख मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली स्वारातीर्थच्या अधिष्ठात्यांना निवेदन

अंबाजोगाई /प्रतिनिधी :-

स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे स्मार्ट कंपनीमार्फत करण्यात येणाऱ्या नोकरभरती प्रक्रियेवर आक्षेप घेत स्वाभिमानी संघटना महाराष्ट्रचे संपर्कप्रमुख मनोज भैया कदम यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

या भरतीसाठी अंबाजोगाई परिसरातील सुमारे १,४०० महिला, विद्यार्थी व युवकांनी अर्ज केले होते. मात्र, भरती प्रक्रियेदरम्यान अचानक काही उमेदवारांची निवड यादी जाहीर करण्यात आल्याने इतर अर्जदारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. जाहीर करण्यात आलेली निवड यादी व संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक नसल्याचा आरोप निवेदनकर्त्यांनी केला असून, सदर भरती प्रक्रिया रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने भरती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

मनोज भैया कदम यांच्या



नेतृत्वाखाली सर्व मित्रपरिवार व संबंधित अर्जदारांनी एकत्र येत स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना निवेदन दिले. भरती प्रक्रियेतील निवड निकष, अर्जदारांची गुणवत्ता, निवड यादी तयार करण्याची पद्धत तसेच संबंधित कंपनीची भूमिका याबाबत सखोल चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी निवेदनकर्त्यांनी मोठ्यांचा आला गाडा आणि गरिबांचे घर मोडा असा आरोप करत, आर्थिकदृष्ट्या वंचित असलेल्या युवकांना रोजगाराच्या संधींपासून दूर ठेवले जात असल्याची भावना व्यक्त केली.दरम्यान, निवड प्रक्रिया प्रत्यक्षात बोगस असल्याचा आरोप करण्यात आला असला तरी, त्याबाबत अधिकृत चौकशीचा निष्कर्ष अथवा संबंधित प्रशासनाची भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी निवेदनकर्त्यांनी केली आहे.

पारदर्शक भरती, सर्व अर्जदारांना समान संधी आणि निवड प्रक्रियेची चौकशी या प्रमुख मागण्यांसाठी देण्यात आलेल्या या निवेदनामुळे अंबाजोगाईतील संबंधित नोकरभरतीचा मुद्दा चर्चेत आला आहे.

# मुख्याध्यापक केशव अटकर यांच्याकडून पार्थ टोपे यांचा सत्कार

कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालयाला भेट विद्यार्थ्यांशी संवाद साधत शाळेच्या अडचणी जाणून घेतल्या

घनसावंगी ।प्रतिनिधी

माजी मंत्री राजेश भैय्या टोपे यांचे चिरंजीव पार्थ राजेश टोपे यांनी घनसावंगी येथील कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाला भेट देत शाळेची पाहणी केली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक केशव अटकर यांनी पार्थ टोपे यांचे स्वागत करून सत्कार केला. त्यांच्यासोबत बबनराव ढेरे उपस्थित होते.भेटीदरम्यान पार्थ टोपे यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या विविध विषयांवरील जिज्ञासेबाबतही त्यांनी माहिती जाणून घेतली.यानंतर त्यांनी विद्यालयातील विविध वर्गखोल्या प्रयोगशाळा तसेच



संगणक प्रयोगशाळेची पाहणी केली. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची त्यांनी परिचय करून घेतला. तसेच विद्यालयाच्या शैक्षणिक कामकाजाची माहिती घेत शाळेसमोरील विविध अडचणी व आवश्यक सुविधांबाबत मुख्याध्यापक केशव अटकर यांच्याशी चर्चा केली.विद्यालयाच्या संपूर्ण परिसराची पाहणी करताना शैक्षणिक सुविधा उपलब्ध साधनसामग्री आणि विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सोयींचीही त्यांनी माहिती घेतली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा पत्रकारिता सेवा गौरव पुरस्काराने सन्मान

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

त्रिदल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांना त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'पत्रकारिता सेवा गौरव पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणे, जनसामान्यांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचविणे तसेच समाजहिताच्या विविध विषयांवर निर्भीडपणे लेखणी चालविणाऱ्या परमेश्वर गित्ते यांच्या कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

यावेळी सायं. दैनिक बीड निक सिटीझनचे अंबाजोगाई प्रतिनिधी शेख फिरोज यांनी ज्येष्ठ पत्रकार परमेश्वर गित्ते यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पत्रकारिता क्षेत्रातील अनुभवी पत्रकाराचा झालेला हा सन्मान म्हणजे त्यांच्या प्रदीर्घ पत्रकारिता



सेवेचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवर, पत्रकार आणि मित्रपरिवारातून परमेश्वर गित्ते यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# एमजीएममध्ये पदवी प्रदान सोहळा थाटात

## डॉ.दानियाल निसार देशमुख यांना एम.बी.बी.एस.पदवी वैद्यकीय क्षेत्रात नव्या पर्वाची सुरुवात

छ.संभाजीनगर विशेष प्रतिनिधी इसरारखान पठाण :- छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात २० सप्टेंबर रोजी पदवी प्रदान समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यात डॉ. दानियाल निसार देशमुख यांना मान्यवरांच्या हस्ते एम.बी.बी.एस. वैद्यकीय पदवी प्रदान करण्यात आली. पदवी प्राप्त झाल्याने देशमुख कुटुंबीयांसह जालना जिल्ह्यातील त्यांच्या मित्रपरिवार आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.या वेळी एमजीएम विश्वस्त मंडळाचे सचिव अंकुशरावजी कदम एमजीएम आरोग्य विज्ञान विद्यापीठ




मुंबईचे उपकुलगुरू डॉ. शशांक दळवी तसेच एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा यांच्या उपस्थितीत डॉ. दानियाल देशमुख यांना पदवीचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. मान्यवरांनी त्यांच्या पुढील वैद्यकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

डॉ. दानियाल निसार देशमुख हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा जालना जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रातील परिचित व्यक्तिमत्त्व डॉ. निसार अहमद देशमुख यांचे चिरंजीव आहेत. डॉ. निसार देशमुख यांनी वैद्यकीय सेवेसोबत सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातही योगदान दिले आहे. विशेषत गरजू आणि गोरगरीब रुग्णांना सेवा देण्याला त्यांनी प्राधान्य दिले आहे.

वडिलांच्या सामाजिक आणि वैद्यकीय कार्याची प्रेरणा घेत डॉ. दानियाल यांनी एम.बी.बी.एस. पदवी संपादन केली आहे. त्यामुळे त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेशाकडे कुटुंबीय तसेच जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. शिक्षण पूर्ण करून आता प्रत्यक्ष रुग्णसेवेच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देण्याचा त्यांचा मानस आहे.

एम.बी.बी.एस. पदवी संपादन केल्याचे वृत्त समजताच महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवर डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पदाधिकारी, कार्यकर्ते, नातेवाईक आणि मित्रपरिवाराने दूरध्वनी तसेच प्रत्यक्ष भेटीद्वारे डॉ. दानियाल यांचे अभिनंदन केले.वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्यास प्राधान्य देणार असा मानस डॉ. दानियाल देशमुख

# काळा हनुमान गणेश मंडळाचा स्तुत्य सामाजिक उपक्रम!

## ९१ रक्तदात्यांनी केले रक्तदान; ९१ नागरिकांची नेत्र तपासणी

रक्तदान व नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न

वडवणी (प्रतिनिधी)

गणेशोत्सवाच्या उत्साहाला सामाजिक बांधिलकीची जोड देत वडवणी शहरातील काळा हनुमान गणेश मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात तब्बल ९१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली, तर ९१ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. रक्तदानाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मदतीचा हात देतानाच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



गणेशोत्सव म्हणजे केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हे, तर समाजसेवा, आरोग्य जागृती आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव देखील असू शकतो, हे काळा हनुमान गणेश मंडळाने आपल्या उपक्रमातून दाखवून दिले आहे.

या शिबिरासाठी मंडळाचे अध्यक्ष विनोद भुजबळ, उपाध्यक्ष गणेश टिपरे, सचिव उफमन्यू भागवत, तसेच अमोल म्हेत्रे, सुरज जाधव, राजेभाऊ खाटवकर, सिद्धेश्वर झाडे, जगदिश झाडे, गणेश कुरकूटे, गणेश म्हेत्रे, राहुल टकले यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच सिटी ब्लड बँकेचे डॉ. शेंडगे, गिरी सर यांचेही सहकार्य लाभले. रक्तदाते, नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सामाजिक उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

रक्तदान हेच श्रेष्ठदान!

आरोग्याची काळजी, समाजसेवेची जाणीव आणि गणेशोत्सवाला सामाजिक कार्याची जोड!

काळा हनुमान गणेश मंडळाच्या या स्तुत्य सामाजिक उपक्रमाचे वडवणी शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# रांगोळीतून उमटले सामाजिक संदेशांचे रंग

## सिद्धीविनायक गणेश मंडळाच्या स्पर्धेला महिलांसह बालचमूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद

भोकरदन इसरारखान पठाण :- गणेशोत्सवाच्या उत्साहाला सामाजिक भानाची जोड देत भोकरदन शहरातील लालगढी गल्ली येथील सिद्धीविनायक गणेश मंडळातर्फे २० सप्टेंबर रोजी भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला महिलांसह बालचमूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध रंगांच्या माध्यमातून साकारलेल्या रांगोळ्यांमधून कलात्मकतेसोबतच सामाजिक संदेशही प्रभावीपणे मांडण्यात आले.

स्पर्धेत सहभागी महिलांनी आणि मुलींनी आकर्षक, कलात्मक व मनमोहक रांगोळ्या साकारल्या. गणेशाची विविध रूपे पाणी वाचवा लहान मुलांनी मोबाईलचा अतिवापर टाळावा स्त्रीभ्रूण हत्या थांबवा अशा सामाजिक विषयांवर आधारित रांगोळ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे ही स्पर्धा केवळ कलाविष्कार न राहता सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी माध्यम ठरली.

मोठ्या गटातील विजेते प्रथम क्रमांक कु. कोमल खारोटे,द्वितीय क्रमांक कु. मानसी शास्त्री,तृतीय क्रमांक कु. मंजिरी शास्त्री छोट्या गटातील



विजेते प्रथम क्रमांक कु. वेदिका सराफ,द्वितीय क्रमांक कु. भार्गवी शास्त्री,तृतीय क्रमांक कु.गौरी सराफ, मोठ्या गटातील विजेत्यांना श्रीकृष्ण ज्वेलर्स भोकरदन यांच्या वतीने आकर्षक बक्षिसे व ट्रॉफी देण्यात आल्या. तसेच मंडळाचे दिवंगत सदस्य कै. तुषार औटी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ औटी परिवारातर्फे छोट्या गटातील विजेत्यांना तुषार यांच्या आजी श्रीमती कमलबाई विश्वनाथराव औटी यांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या.

विशेष म्हणजे स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व स्पर्धकांना सिद्धीविनायक गणेश मंडळातर्फे प्रोत्साहनपर कुंड्यांचे वाटप करण्यात आले. या कुंड्यांमध्ये वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन व संवर्धन करावे असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले. त्यामुळे कला संस्कृती आणि पर्यावरण संवर्धनाचा सुंदर संगम या उपक्रमातून पाहायला मिळाला.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. अंजली जोशी व सौ. दिपाली वडगावकर यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सिद्धीविनायक गणेश मंडळातील तरुण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# प्रस्थापितांचे स्वप्नभंग होणार की आशावादींची आशा प्रबळ होणार ?

## सरपंच आरक्षण सोडतीकडे तामसा परिसराचे लक्ष; इच्छुकांच्या धडधडीत वाढ

दुसरी वेळेस जुलै २०२५ ला आरक्षण सोडत झाली होती.. ही तिसरी वेळ आरक्षण सोडत..

तामसा (प्रतिनिधी) : हदगाव तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत आज होत असल्याने तालुक्यातील ग्रामीण राजकारणाचे वातावरण चांगलेच तापले आहे. तामसा शहरासह परिसरातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये सरपंचपदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या इच्छुकांचे लक्ष आता आरक्षणाच्या सोडतीकडे लागले आहे. त्यामुळे कोणाचे राजकीय गणित जुळणार आणि कोणाचे स्वप्न भंगणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

सरपंचपदाचे आरक्षण हे निवडणुकीपूर्वी निश्चित केले जाते. नांदेड जिल्ह्यात तालुकानिहाय सरपंचपदाचे प्रवर्गनिहाय आरक्षण महिलांसह निश्चित करण्यासाठी सोडत प्रक्रिया राबविण्यात येत आहे. हदगाव तालुक्यातही ही प्रक्रिया तहसील कार्यालयाच्या माध्यमातून पार पडणार आहे.नांदेड जिल्ह्यात सर्वात मोठ्या ग्रामपंचायत

तामसा ग्रामपंचायतीच्या बाबतीत यापूर्वी झालेल्या आरक्षण सोडतीत ग्रामपंचायत स्थापन झाल्यापासून प्रथमच अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी सरपंचपद राखीव झाले होते. त्यामुळे त्या वेळी स्थानिक राजकीय समीकरणांना मोठा धक्का बसला होता. आता नव्याने होणाऱ्या आरक्षण सोडतीत कोणता प्रवर्ग निश्चित होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तामसा परिसरात मागील एका वर्षांपासून संभाव्य उमेदवारांकडून विविध पातळ्यांवर मोर्चेबांधणी सुरू असल्याचे चित्र आहे. काही इच्छुकांनी मतदारांशी संपर्क वाढविला असून, काहींनी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपापली राजकीय ताकद आजमावण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र आरक्षण कोणत्या प्रवर्गाला पडते, यावर अनेक इच्छुकांचे पुढील राजकीय गणित अवलंबून राहणार आहे.

आरक्षणाची सोडत लागेपर्यंत चर्चांना उधाण आले असले तरी प्रत्यक्ष आरक्षण जाहीर झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे. त्यामुळे 'प्रस्थापितांचे स्वप्न कायम राहणार की स्वप्नभंग होणार?' आणि 'नव्या चेहऱ्यांची आशा प्रबळ होणार का?' याचे उत्तर आरक्षण सोडतीनंतरच मिळणार आहे.

तामसा तसेच हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील इच्छुक, विद्यमान राजकीय गट आणि ग्रामस्थांचे लक्ष आता आरक्षण सोडतीच्या निकालाकडे लागले असून, सोडतीनंतर स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात होण्याची शक्यता आहे.

## पाऊस दडी मारतोय पिके भुईसपाट बळीराजा संकटात

# रोषणगाव शिवारातील शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कर्जाचा डोंगर मुलांचे शिक्षण-लग्न अन् वाढत्या महागाईने जगणे झाले मुश्कील

जालना ।प्रतिनिधी

पावसाने दडी मारल्याने बदनापूर तालुक्यातील रोषणगाव परिसरातील शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे. पावसाअभावी शिवारातील पिकांची अवस्था बिकट झाली असून अनेक ठिकाणी पिके अक्षरश भुईसपाट झाली आहेत. डोळ्यासमोर उभे पीक करपताना पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

पेरणीपासून आजवर शेतकऱ्यांनी पिकांसाठी काबाडकष्ट केले. बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीसाठी मोठा खर्च केला. हातात पैसा नसताना कर्ज काढून उभे केलेले पीक आता पावसाच्या प्रतीक्षेत कोमेजत असल्याने शेतकऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकला आहे.कर्ज फेडायचे कसे घर चालवायचे कसे

शेतकऱ्यांच्या डोक्यावर आधीच कर्जाचा डोंगर आहे. त्यातच मुलांचे शिक्षण, मुला-मुलींची लग्ने, घरखर्च आणि वाढती महागाई यामुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे. उत्पन्नाची आशा असलेले पीक हातातून निसटत असताना पुढे करायचे काय, हा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

महागाई दिवसेंदिवस वाढत आहे; मात्र शेतमालाला



अपेक्षित भाव मिळेलच याची शाश्वती नाही. त्यामुळे खिशात दमडी नाही आणि डोक्यावर कर्जाचा भार अशी अवस्था अनेक शेतकऱ्यांची झाली आहे.बळीराजाचे डोळे आभाळाकडे

रोषणगाव परिसरातील शेतकऱ्यांचे डोळे आता आभाळाकडे लागले आहेत. पावसाची एक दमदार सर आली तरी उरलेली पिके वाचण्याची आशा शेतकरी धरून बसला आहे. मात्र दिवसेंदिवस पावसाची प्रतीक्षा लांबत चालल्याने चिंतेचे ढग अधिक गडद होत आहेत.

शेतकरी रडतोय पण डोळ्यात पाणी नाही

कारण डोळ्यातील अश्रूंपेक्षा मनातील चिंता मोठी झाली आहे. वर्षभराच्या कष्टाचे काय होणार कर्जाचा हप्ता कसा फेडणार मुलांचे शिक्षण कसे करणार घरातील लग्नकार्य कसे पार पाडणार? या प्रश्नांनी बळीराजाची झोप उडाली आहे.प्रशासनाने पंचनामे करून तातडीने मदत द्यावी

पावसाच्या लहरीपणामुळे नुकसान झालेल्या पिकांची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार नुकसानभरपाई व मदत द्यावी अशी मागणी रोषणगाव परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

शेतकऱ्यांच्या संकटाकडे प्रशासनाने केवळ कागदोपत्री पाहू नये. शेतात उभे राहून पिकांची खरी परिस्थिती पाहावी आणि बळीराजाला दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आभाळाकडे पाहून दिवस ढकलायचे किती कर्जाचा भार आणि हातात पैसा नाही आता शासनानेच आधार द्यावा अशी हतबल भावना रोषणगावातील शेतकऱ्यांच्या मनातून व्यक्त होत आहे.

# आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली त्रिपक्षीय करारासाठी आंदोलनाची हाक

## करार करा,अन्यथा गळीत हंगाम रोखू उसतोड संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप यांचा इशारा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ऊसतोडणी व वाहतूक कामगार तसेच मुकादमांच्या हक्काच्या मागण्यांसाठी पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेण्यात आली असून, लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे संघटक आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली ऊसतोड कामगारांच्या मागण्यांसाठी लढा उभारण्यात येणार असल्याचे लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप यांनी सांगितले. नव्याने त्रिपक्षीय करार झाल्याशिवाय राज्यातील साखर कारखान्यांचा आगामी गळीत हंगाम सुरू करू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

ऊसतोडणी व वाहतूक कामगार आणि मुकादमांच्या विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगारमंत्री, सहकारमंत्री, साखर आयुक्त, सहकार आयुक्त, समाजकल्याण आयुक्त तसेच साखर संघाचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक यांना संपाची नोटीस देण्यात आली आहे.

राज्यातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार तसेच मुकादमांच्या हक्काच्या सेवा-सुविधांबाबत २७ ऑक्टोबर २०२३ रोजी त्रिपक्षीय करार करण्यात आला होता. तीन वर्षांसाठी करण्यात आलेल्या या कराराची मुदत २०२५-२६ च्या गळीत हंगामात संपली आहे. त्यामुळे २०२६-२७ च्या गळीत हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी नव्याने त्रिपक्षीय करार करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. नव्या करारात ऊसतोडणी कामगारांना प्रति टन ६०० रुपये मजुरी देण्यात यावी, वाढलेल्या डिझेल दर व वाहन देखभालीचा खर्च लक्षात घेऊन ऊस वाहतूक दरात शंभर टक्के वाढ करावी, मुकादमांच्या कमिशनमध्ये ३५ टक्के वाढ करावी, अशी प्रमुख मागणी आहे. तसेच कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी करून ओळखपत्र व सेवापुस्तिका देण्यात यावी, मागील तीन वर्षांचा प्रति टन दहा रुपयांप्रमाणे निधी कामगार कल्याणकारी महामंडळाकडे जमा करावा, कामगारांना भविष्य निर्वाह निधीची सुविधा द्यावी आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती सुरू करावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी ऊसतोड कामगारांच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्याच चळवळीचा वारसा पुढे नेत आज आ.



सुरेश धस हे ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांवर आमच्या सोबत खंबीरपणे उभे आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीच कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी ही लढाई पुढे नेणार आहोत. त्रिपक्षीय करार झाल्याशिवाय गळीत हंगाम सुरू करू देणार नाही, असा निर्धार

लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप यांनी व्यक्त केला. गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी शासनाने कामगारांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन त्रिपक्षीय करार करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

## शिवबा गणेशमंडळ यांचा कीर्तनाचा आदर्श

### ह.भ.प.गणेश महाराज बांगर आळंदीकर यांच्या कीर्तनाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद,असेच जन जागृतीचे कार्यक्रम घ्यावेत भाविकांच्या प्रतिक्रिया

केज/प्रतिनिधी

केज शहरातील धारूर रोडवरील शिवाजीनगर मधील शिवबा (शिवाजीनगरचा राजा) गणेश मंडळाच्या युवा कार्यकर्त्यांनी गणेशोत्सवात धार्मिक व सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत कीर्तनाचा आदर्श घालून दिला आहे. मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळ्यात प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. गणेश महाराज बांगर आळंदीकर यांनी भक्तिमय आणि प्रबोधनपर कीर्तन सादर केले.गणेशोत्सव म्हटले की,विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजनाचे उपक्रम आणि आकर्षक सजावट यांना मोठे महत्त्व दिले जाते.मात्र, यासोबतच भक्ती, संस्कार आणि समाज प्रबोधनाला स्थान देण्याचा उपक्रम शिवबा गणेश मंडळा च्या कार्यकर्त्यांनी राबविला.या उपक्रमाचे परिसरातील नागरिकां कडून कौतुक होत आहे.ह.भ.प.गणेश महाराज बांगर आळंदीकर यांच्या कीर्तनातून भक्ती, सदाचार,संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. महाराजांच्या प्रभावी निरूपणाला उपस्थित भाविकांनी



उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.कीर्तन ऐकण्यासाठी महिला, पुरुष,युवक तसेच बाल भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.युवा पिढीने केवळ मनोरंजनात्मक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता कीर्तनासारख्या संस्कारक्षम आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे,अशी भावना यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना साठी बालाजी ढगे, दीपक इगवे,करण इगवे,आर्यन चटप, प्राविण्य सत्वधर, अक्षय राऊत,गणेश ढाणे,रोहित ढाणे,यश घाडगे,सुधाकर बापू लांब,मधुकर दादा सत्वधर,मोहन ढाणे, संतोष इगवे,गणेश ठोंबरे,भगवंत आप्पा वायबसे,दत्तात्रय ढगे यांच्यासह शिवबा गणेश मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.गणेशोत्सवाच्या माध्यमातून भक्ती बरोबरच संस्कार आणि समाज प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या शिवबा गणेश मंडळाच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.




# करपलेली पिके हातात घेऊन शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार

## जालना जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करा हेक्टरी एक लाखांची मदत व पीकविमा मंजूर करण्याची स्वाभिमानीची मागणी

घुंगर्डे हादगाव बंडू शिंगटे

जालना जिल्ह्यात पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिकांची अक्षरश राखरांगोळी झाली असताना शासन मात्र कागदी घोडे नाचवण्यात व्यस्त आहे. शेतकऱ्यांच्या हातात उत्पन्नाऐवजी करपलेली सोयाबीन-कपाशी आली आहे. या दाहक वास्तवाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करपलेली पिके हातात घेत संतप्त एल्गार केला.

जालना जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी आणि पीकविमा तात्काळ मंजूर करावा, या प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तब्बल एक तास आंदोलन करण्यात आले.पावसाने दीड महिन्यापासून दडी मारल्याने जिल्ह्यातील अनेक भागांत सोयाबीन, कपाशी, तूर, मका यांसह खरीप पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. मोठ्या कष्टाने कर्ज काढून आणि मशागत करून उभी केलेली पिके डोळ्यांसमोर करपून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने आता केवळ पाहणीचे सोपस्कार न करता प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन परिस्थितीची दाहकता पाहावी अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.पिके करपली सरकारचे डोळे कधी उघडणार

शेतात पिके करपली आता तरी सरकारचे डोळे उघडणार का? असा संतप्त सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी केला. कोणतेही अटी-शर्ती अथवा जाचक निकष न लावता दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी. पीक नुकसानभरपाई पीकविमा आणि आवश्यक दुष्काळी सवलती त्वरित लागू कराव्यात अशी मागणी त्यांनी केली.फक्त पंचनामे नकोत शेतकऱ्यांच्या खात्यात मदत हवी शेतकऱ्यांच्या शेतात उभे असलेले पीक आता उत्पादन देण्याच्या अवस्थेत नसून करपून गेले आहे. कागदोपत्री पंचनामे आणि पाहणीच्या नावाखाली वेळकाढूपणा करण्याऐवजी शासनाने तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा अशी भूमिका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा राज्याध्यक्ष मयूर बोर्डे यांनी मांडली.

पावसाअभावी खरीप पिकांसोबतच फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. उत्पादन घटल्याने शेतकऱ्यांसमोर कर्जफेड, मशागतीचा खर्च कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि आगामी हंगामाची तयारी या सर्वच प्रश्नांनी गंभीर रूप धारण केले आहे. त्यामुळे दुष्काळ जाहीर करून नुकसानभरपाई व आर्थिक मदत तातडीने द्यावी अशी मागणी संघटनेने केली.

जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शासनाने ठोस निर्णय घेतला नाही तर आगामी काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने देण्यात आला.आंदोलनावेळी युवा जिल्हाध्यक्ष नामदेव खोसे, जिल्हा सचिव पांडुरंग गटकळ, डॉ. ढोरकुले, अंबड युवा तालुकाध्यक्ष उमेश पाष्टे, परतूर तालुकाध्यक्ष गणेश राजबिंडे, बदनापूर तालुकाध्यक्ष नरेश फटाले, जाफराबाद तालुकाध्यक्ष सुदाम शेवत्रे, तालुका उपाध्यक्ष मुकेश डूचे, अशोक गायकवाड, समाधान गाढवे, बाळासाहेब बिडवे, राहुल गढेकर, गणेश मुरकुटे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# आष्टी,पाटोदा,शिरूरच्या पाणीप्रश्नासाठी २८ सप्टेंबरला माजी आ.भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

## पाणीप्रश्नाकडे राजकीय नव्हे तर विकासाचा प्रश्न म्हणून पाहण्याची गरज

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांतील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या तीन तालुक्यांना गोदावरी व कृष्णा खोरे प्रकल्पातील उपलब्ध पाणी योग्य नियोजनाद्वारे मिळवून द्यावे, अशी प्रमुख मागणी महाराष्ट्र भूषण, शिक्षण महर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.

या मागणीसंदर्भात बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर हॉटेल अन्विता येथे आयोजित पत्रकार परिषदेत माजी आ. भीमराव धोंडे यांनी मोर्चाची भूमिका आणि पाणीप्रश्नाची तीव्रता स्पष्ट केली. यावेळी माजी आ. बाळासाहेब आजबे, महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अजयदादा धोंडे, पाटोदा तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दीपक घुमरे, आष्टी विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब भराटे, आष्टी तालुकाध्यक्ष आरपीआयचे अशोक साळवे, माजी शिक्षण सभापती नियामत बेग, माजी सभापती अनिल जायभाये, महेश सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, सरपंच ज्ञानेश्वर वाघ, माजी सरपंच बाळासाहेब पवार, भागवत वारे, सुरेश राख, बाबासाहेब ससाणे, महारुद्र खेडकर, दत्ता सातपुते यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.




पत्रकार परिषदेत बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) या तीन तालुक्यांमध्ये सातत्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण होत असून सिंचनाअभावी शेतीचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे या भागाला केवळ तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी शाश्वत स्वरूपात पाणी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. गोदावरी खोरे विकास महामंडळ, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ तसेच जलसंपदा विभागाच्या संबंधित योजनांचा आणि उपलब्ध पाणीसाठ्याचा अभ्यास करून या दुष्काळग्रस्त भागाला पाणी देण्यासाठी शासनाने ठोस नियोजन करावे, अशी मागणी त्यांनी केली.

पाणीप्रश्नावर चर्चा करण्यासाठी मोर्चाच्या दिवशी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, गोदावरी खोरे विकास महामंडळ तसेच संबंधित तांत्रिक व प्रशासकीय विभागांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, अशी मागणीही जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

दि. २८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चानंतर शिष्टमंडळासोबत संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घडवून आणावी आणि पाणीप्रश्नाच्या मागण्यांवर तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.कमी पावसामुळे चालू खरीप हंगामातील ऊस, सोयाबीन, तूर, मूग, कापूस, उडीद आणि बाजरी या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला. पावसाअभावी शेतकऱ्यांसमोर उत्पादन घटण्याचे तसेच आर्थिक संकटाचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.

शेतीबरोबरच पशुधनाच्या चारा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्यासाठी मोठ्या जनावरास प्रतिदिन १०० रुपये आणि लहान जनावरास प्रतिदिन ५० रुपये अनुदान थेट पशुपालकांच्या खात्यावर वर्ग करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याची गरज

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांतील पाणीप्रश्न हा केवळ सध्याच्या टंचाईपुरता मर्यादित नसून या भागाच्या भवितव्याशी निगडित असल्याचे माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी सांगितले.

ते म्हणाले की, या तीन तालुक्यांना सिंचनासाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी शाश्वत पाण्याची गरज आहे. गोदावरी आणि कृष्णा खोऱ्यातील उपलब्ध व शिल्लक पाणी या दुष्काळग्रस्त भागाला मिळण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. पाणीप्रश्नाची कायमस्वरूपी सोडवणूक करण्यासाठी दि. २८ सप्टेंबर रोजी काढण्यात येणाऱ्या मोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) या तालुक्यांमध्ये पाण्याची उपलब्धता वाढल्यास शेती, पशुधन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळू शकतो. त्यामुळे उपलब्ध जलस्रोतांचे शास्त्रीय नियोजन, सिंचनासाठी पाण्याचे योग्य वाटप आणि पिण्याच्या पाण्यासाठी दीर्घकालीन व्यवस्था याबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी मोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर दि. २८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मोर्चाकडे आष्टी, पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांतील नागरिकांचे लक्ष लागले असून, संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा होऊन पाणीप्रश्नावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

---

## महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियमांतर्गत महिला शेतकऱ्यांनी प्रमाणपत्रासाठी नोंदणी करावी

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिलांना अधिकृत ओळख मिळावी आणि कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेणे सुलभ व्हावे, यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्राची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील पात्र महिला शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घेऊन प्रमाणपत्रासाठी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.महिला शेतकरी प्रमाणपत्राद्वारे शेती किंवा शेतीशी संबंधित कामामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिलेला अधिकृत महिला शेतकरी म्हणून मान्यता देण्यात येते. महिलेच्या नावावर जमीन असणे हा एकमेव निकष नसून, शेती व संलग्न कृषी कार्यातील प्रत्यक्ष सहभागाला महत्त्व देण्यात आले आहे. पीक उत्पादन व लागवड, बीज उत्पादन, फलोत्पादन, फुलशेती, भाजीपाला उत्पादन, पशुपालन व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्य व्यवसाय, रेशीम उत्पादन, गांडूळखत व कंपोस्ट निर्मिती, अळंबी उत्पादन, कृषीमाल प्रक्रिया व मूल्यवर्धन यासह विविध शेतीपूरक उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या महिलांचा यामध्ये समावेश होऊ शकतो.

महिला शेतकरी म्हणून अधिकृत नोंदणी झाल्यामुळे कृषी विभागाच्या विविध योजना व सुविधांमध्ये महिला शेतकऱ्यांची ओळख सुलभ होण्यास मदत होणार आहे. कृषी कर्ज, पीकविमा, कृषी निविष्ठा, प्रशिक्षण, विस्तार सेवा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी हे प्रमाणपत्र उपयुक्त ठरू शकते. तथापि, संबंधित योजनांच्या स्वतंत्र पात्रता व नियम लागू राहतील.

ऑनलाइन अर्जाची प्रक्रिया

महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी कृषी विभागाच्या हींींि://िहरीश.सेसश्रश/७धइर्थींत्र्ल४ीत्रींट४सत्रः या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येतो. अर्जासाठी अप्लाय नाऊ हा पर्याय निवडून आधार क्रमांक व ओटीपीद्वारे पडताळणी करावी. त्यानंतर जिल्हा, तालुका, गाव, मोबाईल क्रमांक, कृषी कार्याचा प्रकार आदी वैयक्तिक व कृषीविषयक माहिती भरावी. उपलब्ध असल्यास कुटुंबातील सदस्याचा फार्मर आयडी जोडून आवश्यक पडताळणी करावी. भरलेली माहिती तपासून अर्ज सबमिट करावा.

गावातील शेती व शेतीपूरक व्यवसायामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेल्या सर्व पात्र महिला भगिनींनी महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी करून घ्यावी. महिलांचा शेतीतील सहभाग अधिकृतपणे नोंदविण्यास तसेच भविष्यातील कृषीविषयक सुविधा व योजनांशी जोडले जाण्यास ही प्रक्रिया महत्त्वपूर्ण आहे. अर्ज करताना चुकीची किंवा अपूर्ण माहिती देऊ नये. अर्जासंदर्भात अडचण किंवा मार्गदर्शन आवश्यक असल्यास संबंधित तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

---

## बेलगांव येथे बुधवारी शालेय वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा व निमंत्रितांचे कवी संमेलन रंगणार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील बेलगांव येथे रेणुकाई सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने शालेय वक्तृत्व स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ तसेच निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता विठ्ठल-रुखमाई मंदिर, बेलगांव येथे हा साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कवी हरिष हातवटे सर भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्लभाऊ सहस्त्रबुद्धे, दैनिक 'झुंजारनेता'चे उपसंपादक उत्तमराव बोडखे तसेच 'छत्रपतींचा मावळा' फेम रील स्टार समीर शेख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या निमंत्रितांच्या कवी संमेलनात कवी इंद्रकुमार झांजे, कवी सुनील शेळके, कवी राजेंद्र लाड, कवी संजय शेळके, कवी नवनाथ पोकळे, कवी नागेश शेलार, कवी संदीप पाचारणे, कवी अजित भराटे, कवी विजयकुमार झगडे आणि कवयित्री श्रीमती नजमा शेख हे आपापल्या विविधांगी रचना सादर करणार आहेत. त्यामुळे रसिकांना सामाजिक, देशभक्तीपर, भावनिक व मनोरंजनात्मक कवितांचा आस्वाद घेता येणार आहे.

कार्यक्रमास युवा उद्योजक प्रवीण वारे, सुखदेव पोकळे, कल्याणराव पोकळे, माजी सरपंच बन्सीभाऊ पोकळे, ज्येष्ठ पत्रकार किरण पोकळे, माजी सरपंच मधुकर पोकळे, संजय पोकळे, माजी सरपंच प्रा. आबासाहेब पोकळे, जयसिंग पोकळे, चेअरमन नारायण पोकळे, मेजर रावसाहेब पोकळे, मारुती मामा पोकळे, दिलीप पोकळे, अमृत पोकळे, केंद्रप्रमुख प्रवीण मेहेरकर सर, मुख्याध्यापक आर. आर. खंडागळे सर, मोहन पोकळे, सदाशिव पोकळे, डी. के. आबा पोकळे, माजी उपसरपंच सदाआण्णा पोकळे, माजी उपसरपंच सतीश पोकळे, माजी उपसरपंच संजय पोकळे तसेच आर. आर. पाखरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन व निमंत्रण सरपंच तात्यासाहेब शिंदे, उपसरपंच सौ. मिराताई ज्ञानेश्वर पोकळे, अध्यक्ष दीपक पोकळे, शालेय समिती अध्यक्ष सतीश




पोकळे, बिभीषण पोकळे (बुरूजवस्ती), निखिल फुलचंद पोकळे (म्हसोबावस्ती) तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य यांच्या वतीने करण्यात आले आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वकौशल्याला प्रोत्साहन देतानाच साहित्यिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण करणाऱ्या या कार्यक्रमाचा लाभ परिसरातील विद्यार्थी, पालक, साहित्यप्रेमी, काव्यरसिक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

---

## निवासी अंध विद्यालय वसरणीचे मुख्याध्यापक राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार अंतर्गत समता दूत दिव्यांग शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित

नवीन नांदेड -वसरणी ज्योतीबा फुले सेवा ट्रस्ट नांदेड संचलित, निवासी अंध विद्यालय वसरणी नांदेड या शाळेचे मुख्याध्यापक बाबाराव माधवराव इबितवार (नंदेवार) यांना दिव्यांग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्या बाबत मातोश्री लक्ष्मीबाई ठाकुर बहूउददेशीय सेवाभावी संस्था व मायडी बहूउददेशीय सेवाभावी संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार अंतर्गत समता दुत दिव्यांग शिक्षण रत्न पुरस्कार २०२६ देऊन सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक भारतजी वानखेडे, संचालक जीमखाना मॅको बँक मंत्रालय मुंबई, तथा अध्यक्ष अनुसुचित जाती -जमाती, विजा, भज, विमाप्र/शा.नि. कर्मचारी संघटना मंत्रालय मुंबई व मा.सय्यद मुजिद सय्यद जाहेद ,इंजि.अंबादासजी चंदनशीवे उपसचिव कृषी विभाग मंत्रालय,मुंबई, धर्मगुरु संत सुकविंदरसिंघ बाबा, राजकुमार इंगळे, ड.गोणारकर,प्रा.जे.टी.जाधव यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय समता गौरव पुरस्कार अंतर्गत समता दुत दिव्यांग शिक्षणरत्न पुरस्कार २०२६ एका शाही सोहळयामध्ये त्यांना पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

यावेळी पुरस्कार स्विकारतांना त्यांच्या पत्नी सौ. संजिवनी नंदेवार, मातोश्री श्रीमती अनुसया,मुलगा,डॉ.कृष्णप्रसाद,मुलगी पुजा नातेवार, आरती चुडेवार,कु.अमोदिनी, कु.रुद्रानी कलाल गौड तेलंग समाजाचे युवा प्रदेशाध्यक्ष सुनिल आनंतवार, कॉम्रेट राज्यसचिव उज्वला पडलवार,कॉम्रेट गंगाधर, नांदेड जिल्हा कलालगौड समाजाचे सचिव गंगाधर नंदेवाड, जिल्हा ग्राहक मंचाचे जिल्हाध्यक्ष डॉ.सायन्ना मठमवार,सामाजिक कार्यकर्ते अशोक नातेवार,गणेश बच्चेवार यांच्या समवेत पुरस्कार देण्यात आला. यावेळी समाजा तर्फे आखिल भारतीय कलवार, कलाल, कलार महासभा दिल्ली तर्फे बाबाराव माधवराव इबितवार यांना नांदेड जिल्हा प्रभारी म्हणुन नियुक्तीपत्र देण्यात आले. दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनिय व प्रेरणादयी कार्य करुन समाजाला दिलेल्या मौलाच्या योगदाना बदल आपल्या कार्यातून समाजाला सकारात्मक दिशा मिळाली असून आपल्या योगदानामुळे समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि मानवता या भारतीय संविधानाच्या मुल्यांना बळकटी मिळत आहे. आपण आपल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे निष्ठेने आणि सामाजिक बांधीलकीच्या भावनेतून केलेली उल्लेखनिय कामगीरी निश्चितच प्रेरणादायी आहे. आपल्या कृतुत्वाची दखल घेवून समाजाप्रती असलेल्या आपल्या योगदाना बदल कृतज्ञता व्यक्त करीत आपणांस हा सन्मान आदरपूर्वक देण्यात आला असे श्री.भारतजी वानखेडे यांनी म्हटले आहे. त्यांनी मागील ३३ वर्षापासून अंध मुलांसाठी शाळेत विविध उपक्रम राबवून अंध विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात कलागुणांचा विकास केला आहे. तसेच अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात पूनर्वशीत केले आहे. दिव्यांग मुलांचा सर्वांगीन विकास व पुनर्वसनाचे उत्कृष्ट कार्य करत आहेत.

आपल्या शाळेच्या माध्यमातून अंध विद्यार्थ्यांना प्रवेशीत करुन गुणवत्तापूर्वक शिक्षण देवून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याची प्रेरणा देत आहेत. खेडयापाडयात घरोघरी जावून दिव्यांग विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर



कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून खेडोपाडी जावून दिव्यांग विद्यार्थ्यांना शाळेच्या सर्वसामान्य प्रवाहात आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. सदर शाळेच्या शिक्षकांनी राष्ट्रीय एकात्मतेला प्रोत्साहन देण्यासाठी काही विशिष्ट उपक्रम हाती घेतले आहे. उदा. राष्ट्रीय एकात्मता, व्यसनमुक्ती, हुंडाबंदी, स्वच्छता अभियान,वृक्षारोपन, मुलगी वाचवा, पाणी वाचवा, रस्तदान शिबीरे इत्यादी उपक्रम राष्ट्रीय एकात्मतेसाठी हाती घेतले जाते. मुल्य शिक्षणा साठी राष्ट्रीय एकात्मता धर्मनिरीपेक्ष, मानवी हक्क या सारखी मुल्य विकसीत केली आहेत. दरवर्षी भुगोल, विज्ञान आणि इतिहासाचे ज्ञान वाढविण्या साठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी, गायन, नाटक, नृत्य, स्पर्धेत भाग दिला जातो. विद्यार्थ्यांचे दररोज वाचन, लेखन, नाटकाचे प्रयोग, पत्र लेखन, निबंध लेखन, वाद विवाद स्पर्धा, वृतत्व स्पर्धा आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी उपक्रम घेतले जातात. थोर नेत्याच्या जयंती /पुन्यतीथी साजरी केली जाते. यशस्वी माजी विद्यार्थ्यांना शाळेत बोलावून त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना दिले जाते. कमकुवत विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष दिले जाते. विविध स्पर्धा परीक्षेसाठी प्रोत्साहित केले जाते. अभ्यासाची आवड निर्माण करणे, प्रश्न उत्तराचे सराव करुन घेणे. यासाठी शाळेतील शिक्षकांना राज्यव्यापी प्राथमिक शिक्षक प्रशिक्षणासाठी वेळोवेळी पाठविले जाते. त्याच बरोबर रक्षा बंधन, गणेश उत्सव, नागपंचमी सारखे भारतीये उत्सव साजरे करुन विद्यार्थ्यांमध्ये भारतीय सांस्कृती रुजविली जाते.. त्या बरोबर पालक मेळावा, आरोग्य शिबीर घेतले जातात. नेतृत्व गुण वाढविण्यासाठी वाढ दिवस जयंत्या साजऱ्या करुन विद्यार्थ्यांना वकृत्वाद्वारे नेतृत्व गुण वाढविण्यास मदत केली जाते. शिक्षक दिन, ब्रेल लिपी मराठी, इंग्रजी, हिंदी हस्ताक्षरात सुधारणा करण्यासाठी उपक्रम राबविले जातात.त्याच बरोबर अंध श्रध्दा निर्मुलन जनगनना कार्यक्रम, कुंटुंब कल्याण, पल्स पोलीओ, निवडणुका या सर्व राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग शाळा नोंदविते. तसेच जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवून उज्वल यश संपादन करण्याची प्रथा या शाळेस आहे. तंबाखु धुम्रपान, एडस जनजागृती केली जाते.

मुख्याध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली नेहमी संरचनात्मक ज्ञान, उपक्रम, परिश्रम, वेळ, शिस्त बहूआयामी गुणवत्तेचा आदर करतात. त्यामुळे विद्यार्थी आणि समाजावर सकारात्मक विचार श्रणीचा प्रभाव पडतो. ते अज्ञाधारक कष्टाळु वेळेचे पाबंद आणि आष्टूपैलुगुण असलेले शिक्षक या शाळेला लाभल्यामुळे आजचा पुरस्कार माझा नसून संस्थेचा व शाळेचा सन्मान आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सौ. सुनिताताई गुटटे सचिव विठठलराव गुटटे, उपाध्यक्ष, नागेश गुटटे, कोषाध्यक्षा सौ. सत्यश्री रमेश खाडे, शाळेचे विशेष शिक्षक रामरावजोजार, वसुधा निकम,संगीत शिक्षक पंकज शिरभाते, भास्कर अनेराये,सुरेश होळंबे बलभिम केंद्रे, नामदेव इंगळे, नागनाथ कुच्वेवार, संतोष सावते, अक्षय तोटवाड, रंजना सातोरे, रत्नाबाई सुर्वेसे, जिजाबाई वाघमारे, सुभाष केंद्र संस्थापक मंडळ, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा देवून अभिनंदन केले आहे.

---

## नांदेड जिल्ह्यात २१ ते २४ सप्टेंबरदरम्यान 'येलो अलर्ट'

नांदेड जिल्हा प्रतिनिधी :- प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी २१ ते २४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पावसाची शक्यता असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

२१, २२ व २४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजांच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. तसेच २३ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे, विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट यांसह मुसळधार पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती खबरदारी व प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. नागरिकांनीही हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून सुरक्षितता बाळगावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुन्हे यांनी केले आहे.

विजा चमकत असताना घ्यावयाची काळजी

विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्यास शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे. मोकळ्या जागेत असल्यास जवळच्या सुरक्षित इमारतीचा आश्रय घ्यावा. सुरक्षित इमारत उपलब्ध नसल्यास सखल जागी जाऊन गुडघ्यात डोके घालून बसावे. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नये.

घरातील विद्युत उपकरणे बंद करून शक्य असल्यास त्यांचा वीजपुरवठा खंडित करावा. तारांचे कुंपण, विद्युत खांब तसेच इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहावे. पाण्यात असल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी बाहेर पडावे.

या गोष्टी टाळाव्यात

विजा चमकत असताना लँडलाईन फोनचा वापर, शॉवरखाली अंघोळ करणे, नळ अथवा पाण्याच्या पाइपलाइनला स्पर्श करणे तसेच विद्युत उपकरणांचा वापर टाळावा. वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट सुरू असताना लोखंडी सांगाड्याच्या तंबूत किंवा शेडमध्ये आश्रय घेऊ नये.

उंच झाडांच्या खाली थांबू नये. धातूच्या उंच मनोऱ्यांजवळ उभे राहू नये. घरात असताना उघड्या दारातून किंवा खिडकीतून वीज पडताना पाहू नये. या काळात नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळून सुरक्षित ठिकाणी राहावे, असेही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने कळविले आहे.

---

## आष्टी येथे आ.सुरेश धस यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षकांसाठी 'शालेय स्पर्धा परीक्षा' दिशादर्शक कार्यशाळा

### निपुण बीड अभियानांतर्गत २६ सप्टेंबर रोजी आयोजन ;तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ध्येय निश्चित असू द्या, प्रयत्नांना दिशा असू द्या; योग्य मार्गदर्शनाच्या बळावर यशाची नवी शिखरे गाठू द्या! या उद्देशाने शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या वतीने 'निपुण बीड अभियानांतर्गत शालेय स्पर्धा परीक्षा - शिक्षक कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले आहे. आष्टी, पाटोदा व शिरूर विधानसभा मतदारसंघातील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा शालेय विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांसाठी प्रभावीपणे मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

ही कार्यशाळा शनिवार, दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता, नगर-बीड रोडवरील मोरेश्वर मंगल कार्यालय, आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे होणार आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जितिन रहमान यांच्या हस्ते होणार असून, आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघाचे सदस्य मा. आ. सुरेश (अण्णा) धस हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



राहणार आहेत.

कार्यशाळेस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मा. जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (योजना) मा. डॉ. किरण कुंवर आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा. प्रियाराणी पाटील, जिल्हा परिषद बीड या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विविध स्पर्धा परीक्षांसाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

शालेय विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध बाबींवर या कार्यशाळेत अनुभवी मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पुणे येथील श्रीमती अनिता शरद परदेशी या इयत्ता सातवी शिष्यवृत्ती तसेच एनएमएमएस परीक्षेबाबत मार्गदर्शन करणार आहेत. वाशिम येथील श्री. विनोद बबनराव झनक हे नवोदय परीक्षा मार्गदर्शन करणार आहेत. तसेच कोल्हापूर येथील श्री. संजय आनंदा शिंदे हे इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेबाबत मार्गदर्शन करणार असून, पुणे येथील श्री. प्रदीप शिवाजी धुमाळ हेही इयत्ता चौथी शिष्यवृत्ती परीक्षेसंदर्भात शिक्षकांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तयार करताना अभ्यासक्रमाचे नियोजन, परीक्षेची दिशा, सराव, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वेळेचे नियोजन तसेच विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित करण्याच्या विविध पद्धतींबाबत शिक्षकांना या कार्यशाळेत मार्गदर्शन मिळणार आहे.

आ. सुरेश धस यांच्या संकल्पनेतून तसेच शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या आयोजनातून ही कार्यशाळा होत आहे. आष्टी, पाटोदा व शिरूर विधानसभा मतदारसंघातील शिक्षकांना शालेय स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने दिशादर्शक ठरणाऱ्या या उपक्रमाचा लाभ घेता यावा, हा या कार्यशाळेमागील प्रमुख उद्देश आहे.

कार्यशाळेसाठी आष्टी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. प्रयाग ढमाळ व गटशिक्षणाधिकारी श्री. रवींद्र महामुनी, पाटोदा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. संतोष माने व गटशिक्षणाधिकारी श्री. सिद्धांत कांबळे, तसेच शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. भरत नागरे व गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत शिंदे यांनी शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्यासाठी आणि शालेय स्तरावरच स्पर्धा परीक्षांची भक्कम तयारी करून घेण्यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. त्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेकडे आष्टी, पाटोदा व शिरूर परिसरातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

# किनवटमध्ये १६.३७ कोटींच्या शासकीय निधी व्यवहारांचा आरोप

## २८० शासकीय धनादेशांद्वारे खासगी खात्यांमध्ये रक्कम वर्ग केल्याचा दावा; वरिष्ठ लिपिक तथा रोखपालाविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल

किनवट प्रतिनिधी । ( कचरू जोशी ) :- किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संबंधित शासकीय निधीच्या व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शासकीय डइख बँक खाते क्रमांक ६२०२१२४७८६३ मधून तब्बल १६ कोटी ३७ लाख ६६ हजार ९१२ रुपये विविध खासगी व्यक्ती, व्यावसायिक दुकाने तसेच इतर अशासकीय घटकांच्या बँक खात्यांमध्ये वर्ग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी किनवट पोलिस ठाण्यात गु.र.नं. २५६/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस तपासाला सुरुवात झाली आहे. प्राप्त माहितीनुसार, १ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संबंधित शासकीय बँक खात्यातून हे व्यवहार झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या कालावधीत तब्बल २८० शासकीय धनादेश बँकेमार्फत क्लिअरिंग करून वटविण्यात आले आणि त्यातून काढण्यात आलेली रक्कम अधिकृत शासकीय वापराऐवजी खासगी व अशासकीय घटकांच्या खात्यांमध्ये वर्ग करण्यात आल्याचा आरोप आहे.

पदाचा गैरवापर केल्याचा आरोप

या प्रकरणात भगवान उद्धवराव डवरे, वय ३९ वर्षे, वरिष्ठ लिपिक तथा रोखपाल, यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित आरोपीने आपल्या पदाचा कथित गैरवापर करून शासकीय निधीशी संबंधित आर्थिक व्यवहार केले. शासकीय धनादेश, धनादेश नोंदवही आणि इतर अधिकृत अभिलेखांमध्ये फेरफार करून आर्थिक व्यवहार लपविण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. शासकीय कार्यालयातील रोखपाल म्हणून आर्थिक व्यवहारांशी संबंधित जबाबदारी असलेल्या व्यक्तीविरुद्ध एवढ्या मोठ्या रकमेच्या व्यवहारांचा आरोप झाल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. मात्र, या आरोपांची सत्यता तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

२८० धनादेशांचा तपास ठरणार महत्त्वाचा




या प्रकरणातील २८० शासकीय धनादेश तपासाचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. प्रत्येक धनादेश कोणत्या कारणासाठी काढण्यात आला, त्यावर कोणाच्या स्वाक्षऱ्या आहेत, धनादेश कोणाच्या नावे होते, कोणत्या बँक खात्यात रक्कम जमा झाली आणि त्या व्यवहाराला संबंधित कार्यालयाची अधिकृत मंजुरी होती का, याची तपासणी पोलिसांकडून केली जाण्याची शक्यता आहे. तसेच संबंधित कालावधीतील बँक स्टेटमेंट, धनादेश नोंदवही, रोकडवही, कार्यालयीन मंजुरीपत्रे, देयकांची कागदपत्रे आणि लाभार्थ्यांच्या खात्यांची माहिती तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. या सर्व कागदपत्रांच्या पडताळणीतून प्रत्यक्षात किती रक्कम कोणत्या कारणासाठी खर्च झाली आणि किती रक्कम अनधिकृतरीत्या वर्ग झाली, याबाबत अधिक स्पष्टता निर्माण होऊ शकते.

खासगी खात्यांमध्ये रक्कम वर्ग केल्याचा आरोप

तक्रारीमध्ये शासकीय खात्यातून काढण्यात आलेली रक्कम खासगी त्रयस्थ व्यक्ती, व्यावसायिक दुकाने आणि इतर अशासकीय खासगी घटकांच्या बँक खात्यांमध्ये वर्ग करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या खात्यांची ओळख पटविणे आणि त्यांच्याशी संबंधित व्यवहारांची साखळी तपासणे हे तपासातील महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.रक्कम कोणाच्या खात्यात, कोणत्या तारखेला आणि कोणत्या कारणास्तव वर्ग करण्यात आली, त्यानंतर त्या रकमेतून पुढे कोणते व्यवहार झाले, याची आर्थिक तपासणी झाल्यास या प्रकरणाचे स्वरूप अधिक स्पष्ट होऊ शकते.

अभिलेखांमध्ये फेरफार केल्याचाही आरोप

केवळ बँक व्यवहारांपुरतेच हे प्रकरण मर्यादित नसून, शासकीय अभिलेख आणि धनादेश नोंदवहीमध्ये कथित फेरफार व बनावटीकरण केल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. शासकीय निधीच्या प्रत्येक व्यवहाराची अधिकृत नोंद ठेवणे आवश्यक असताना नोंदींमध्ये फेरफार झाल्याचा आरोप गंभीर मानला जात आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित कार्यालयातील मूळ अभिलेख पोलिस तपासासाठी ताब्यात घेतले जातात का, त्यांची पडताळणी कोणत्या पद्धतीने केली जाते आणि बँक अभिलेखांशी कार्यालयीन नोंदी जुळतात का, याकडे लक्ष लागले आहे.

पोलिस ठाण्यात पहाटे गुन्हा दाखल

या प्रकरणातील फिर्यादी प्रेमसिंग बाबूसिंग आडे, वय ५१ वर्षे, हे किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाशी संबंधित आहेत. त्यांच्या जबाबावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ३.२४ वाजता, किनवट पोलिस ठाण्यातील ठाणे दैनंदिनी क्रमांक ५ वर या प्रकरणाची नोंद करण्यात आली. झडख लेनगुळे यांनी गुन्हा दाखल केला असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक मंडलवार हे स्वतः करीत आहेत.१६ कोटींपेक्षा अधिक रकमेच्या कथित व्यवहारांचा कालावधी सुमारे अडीच वर्षांपेक्षा अधिक असल्याने तपासाचा आवाका मोठा आहे. संबंधित कालावधीतील सर्व २८० धनादेश आणि त्यांची बँक क्लिअरिंग माहिती तपासणे, संबंधित खातेदारांची चौकशी करणे, कार्यालयीन अधिकाऱ्यांच्या जबाबांची नोंद घेणे तसेच शासकीय नोंदी आणि प्रत्यक्ष बँक व्यवहार यांची पडताळणी करणे आवश्यक ठरणार आहे. तसेच या व्यवहारांना कोणाची प्रशासकीय अथवा आर्थिक मंजुरी होती, धनादेश तयार करण्यापासून ते बँकेत वटविण्यापर्यंतच्या प्रक्रियेत कोणकोणत्या व्यक्तींची भूमिका होती आणि या व्यवहारातून प्रत्यक्ष आर्थिक लाभ कोणाला झाला, याचाही तपास होण्याची शक्यता आहे.या प्रकरणामुळे शासकीय निधीच्या आर्थिक व्यवहारांवर देखरेख, धनादेश प्रक्रियेतील नियंत्रण आणि कार्यालयीन अभिलेखांच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतरच या प्रकरणातील आरोपांचे नेमके स्वरूप, आर्थिक नुकसानीची वास्तविक रक्कम आणि संबंधित व्यक्तींची भूमिका स्पष्ट होणार आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार

## श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा उपक्रम; विद्यार्थी, पालक व शिक्षकांची मोठी उपस्थिती

किल्ले धारूर (प्रतिनिधी)

किल्लेधारूर येथील श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार समारंभ रविवारी (दि. २०) उत्साहात पार पडला.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ बाबासाहेबआंबेडकर, सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.कार्यक्रमास संस्थाध्यक्ष बाळासाहेब राठोड, सहशिक्षक माधव पंतोजी, पत्रकार अतुल भैय्या शिनगारे, माजी पोलीस निरीक्षक मानसिंग राठोड, संचलिका राठोड मॅडम ,तालुकाध्यक्ष पोलीस पाटील संघटना सचिन थोरात, सहशिक्षक नाथा ढगे, प्रतिष्ठित व्यापारी धनराज लांब, प्रगतशील शेतकरी प्रदीप बाप्पा शिनगारे, डॉ डीसले, आणि सामाजिक कार्यकर्ते अतीक मोमीन यांची प्रमुख उपस्थिती




होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृष्ण केशरिया शिक्षण संस्थेचे सचिव बाळासाहेब राठोड होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कांदे सर यांनी केले, तर बाळासाहेब राठोड यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी शाळे मध्ये विविध स्पर्धा परीक्षांमध्ये २०२५ - २६ या कालावधी मध्ये शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये त्यांची मेहनत, पालकांचे प्रोत्साहन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे मान्यवरांनी सांगितले.यावेळी सचिन थोरात व नाथाभाऊ ढगे यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच विविध क्षेत्रांत आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, तसेच पालकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमास पालक नगरसेवक गणेश सावंत, डॉ गोकुळ शिनगारे, डॉ नवनाथ चव्हाण , अजित शिनगारे ,मिथुन गायसमुद्रे, अशोक गायके, पंजाब जगताप सह विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी उत्साह निर्माण झाला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुख्याध्यापिका,

# रक्तदानाबरोबरच अन्नदानाचा यज्ञ, जगदंबा गणेश मंडळाची अमृत महोत्सवाकडे वाटचाल

गेवराई(प्रतिनिधी):- शहरातील भवानी पेठ येथील रेणुका माता देवी मंदिरातील जगदंबा गणेश मंडळाचे यंदा ५६ वे वर्ष आहे. मागील २५ वर्षापासून गणेश उत्सवात रक्तदान शिबिर, अन्नदान,देखावे असे विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवून गणेश उत्सव साजरा केला जात आहे.

गणेशोत्सवात ३ हजार ५०० रक्तदान करणारे हे एकमेव गणेश मंडळ आहे.



शहरातील भवानी पेठ येथील रेणुकामाता देवी मंदिरात १९७० मध्ये पहिल्या गणपतीची प्रतिष्ठापना रामप्रसाद अट्टल, बदामराव पंडित, संभाजीराव पंडित, छगन संभाहरे, राम रूकर, संभाजी संभाहरे, शफी अत्तार यांनी केली होती. या गणेश मंडळाकडून मागील २५ वर्षात ३ हजार ५०० जणांनी रक्तदान केले. गणेशभक्तांसाठी येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. जगदंबा गणेश मंडळाचे मार्गदर्शक शाम रुकर, रवींद्र रुकर, संभासेठ संभाहरे, श्याम कापसे, अशोक टोणपे, गजानन संभाहरे तसेच यावर्षीचे गणेश मंडळाचे अध्यक्ष बसवराज मिटकर, उपाध्यक्ष शुभम संभाहरे आदी परिश्रम घेतात. सचिव अनिकेत वाडकर म्हणाले की यावर्षी गणेश मंडळाचे ५६ वे वर्ष असून यावर्षी रक्तदान शिबिर व अन्नदानाचे आयोजन करण्यात आले आहे. गुलालाऐवजी फुलांची उधळण केली जाते १२ वर्षापासून या गणेश मंडळाचे पदाधिकारी येथील सहारा अनाथालयात विद्यार्थ्यांना भोजन, वह्या, पेन देण्यात येतात. या गणपतीचे विसर्जन येथील चिंतेश्वर मंदिराच्या विहिरीत गुलालाची उधळण न करता फुलांची उधळण करून केले जाते. नव्या पिढीनेही अन्नदान व रक्तदान शिबिराचा यज्ञ पुढे सुरू ठेवला आहे.

जगदंबा मंडळाचा यंदाचा गणपती गणेश मंडळाने पटकावली पारितोषिके जगदंबा गणेश मंडळाने अनेक वर्षांपासून गणेश मंडळाची मिरवणूक, स्वच्छता, विविध सामाजिक संदेश देणारे देखावे स्पर्धेत जिल्हास्तरीय व तालुका स्तरावर विविध पारितोषिके पटकावलेली आहेत.

## नांदेड जिल्ह्यात ‘सेवा संकल्प अभियान’च्या

# प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करावे

नांदेड : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ‘सेवा परमोधर्म’ या उक्तीनुसार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विविध शासकीय सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ दरम्यान ‘सेवा संकल्प अभियान’ राबविण्यात येणार आहे. या अभियानाची नांदेड जिल्ह्यात प्रभावी व यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागांनी योग्य समन्वय ठेवून उपक्रमांचे काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. दरम्यान, या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांनी शासकीय योजना व सेवांचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

‘सेवा संकल्प अभियान’च्या जिल्हास्तरीय अंमलबजावणी समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, सर्व उपविभागीय अधिकारी, महिला व बालविकास विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त राजपाल कोल्हे, नगर पालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त , यांच्यासह विविध विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते.

शासनाच्या निर्देशानुसार दि. १७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत नागरिककेंद्री विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, सेवा व उपक्रमांचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांमध्ये शासकीय योजनांविषयी जनजागृती करणे तसेच प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करणे, हा अभियानाचा प्रमुख उद्देश असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले.

या अभियानांतर्गत ‘सेवा सेतू अभियान’, ‘इनोव्हेशन चॅलेंज’, ‘सेवा माझे योगदान’, ‘विकसित भारत संकल्प यात्रा’, ‘सेवा ज्योत यात्रा’, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, ‘अंगणवाडी उत्सव’, ‘आशीर्वादाचा दिवा’, ‘बदलाची गोष्ट’, ‘आभार आणि संकल्पाची रांगोळी’, ‘नमो सेवा गाथा’, ‘जल, जन आणि संकल्प यात्रा’ तसेच ‘जनसेवक महाकुंभ’ यांसारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगून सर्व विभागप्रमुखांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थित पार पाडावी तसेच अभियानात केलेल्या कामाची पूर्वीची व नंतरची छायाचित्रे आणि व्हिडीओ चित्रिकरण करून ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांचा या अभियानात व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी संबंधित विभागांनी आपल्या कार्यक्षेत्रानुसार उपक्रमांचे नियोजन करावे. प्रत्येक उपक्रमाचा उद्देश, अपेक्षित लाभार्थी, आवश्यक मनुष्यबळ, प्रसिद्धी-प्रसार आणि अंमलबजावणीचे वेळापत्रक याबाबत योग्य नियोजन करण्यात यावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिल्या.

‘सेवा सेतू’च्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ सुलभतेने मिळावा, यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी ‘इनोव्हेशन चॅलेंज’, युवक व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



निर्माण करण्यासाठी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा, महिला व बालकल्याणाशी संबंधित उपक्रमांद्वारे जनसहभाग वाढविणे, तर ‘जल, जन आणि संकल्प यात्रा’च्या माध्यमातून जलसंवर्धन व लोकसहभागाचा संदेश देण्यावर भर देण्यात येणार आहे.

अभियानाच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी-प्रसार करण्याच्या दृष्टीनेही संबंधित विभागांनी नियोजन करावे. शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळवून देताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी क्षेत्रीय पातळीवर विशेष प्रयत्न करावेत, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले.

‘सेवा परमोधर्म’ या संकल्पनेनुसार नागरिकांना अधिक गतिमान, पारदर्शक आणि प्रभावी सेवा देण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी यावेळी सांगितले.

# गणेश विसर्जनानंतर गोदावरीत पोहणे जीवावर बेतले

## दोन अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा दुर्दैवी अंत




नांदेड (प्रतिनिधी):- श्री गणेश विसर्जनासाठी गोदावरी नदीकाठी गेलेल्या अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या दोन तरुणांचा नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी दुपारी विष्णूपुरी येथील काळेश्वर घाट परिसरात घडली. गणेश विसर्जनानंतर पोहण्यासाठी नदीत उतरलेल्या दोघांना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.मृतांमध्ये बजरंग बिरू येडूरे (वय १८, रा. किनी, ता. देगलूर) आणि दीपक मारुती सोळुंके (वय २०, रा. बाहऱ्हाळी, ता. मुखेड) यांचा समावेश आहे. दोघेही वाडी पाटीजवळील मातोश्री प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत होते.रविवारी गणेश विसर्जनाच्या निमित्ताने दोन्ही तरुण काळेश्वर मंदिर परिसरातील गोदावरी नदीकाठी आले होते. गणेशमूर्तीचे विसर्जन केल्यानंतर त्यांनी पोहण्यासाठी नदीपात्रात प्रवेश केला. मात्र, नदीतील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने दोघेही पाण्यात बुडाले.

घटनेची माहिती मिळताच जीवरक्षक दलाला पाचारण करण्यात आले. जीवरक्षकांनी शोधमोहीम राबवत बजरंग येडूरे याचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. दरम्यान, दीपक सोळुंके याचा शोध घेण्याचे काम सुरू होते. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच विष्णूपुरीचे पोलीस पाटील घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनेची नोंद घेत पुढील कार्यवाही सुरू केली असून, दोन्ही तरुणांच्या नातेवाईकांना घटनेची माहिती देण्यात आली आहे.गणेश विसर्जनाच्या उत्साहात नदीपात्रात पोहण्याचा मोह दोन कुटुंबांसाठी काळाचा घाला ठरला. नदीपात्रात उतरताना पाण्याची खोली, प्रवाह आणि सुरक्षिततेच्या उपायांचा विचार करणे आवश्यक असल्याचे या दुर्घटनेने पुन्हा अधोरेखित केले आहे.